# महासागर नागपूर वृत्तसागर

■ मंगळवार, दि. १७, जुन २०२५ ■


## लुटपाट प्रकरणात तिघांना अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

पाचपावली पोलिसांनी ठाण्यांतर्गत जबरी चोरीच्या प्रकरणाचा पदार्फाश करीत तीन आरोपींना अटक केली. चौकशीत आरोपींकडून चोरीचे 5 गुन्हेही उघडकीस आले. राकेश उर्फ खट्या नरेश झोडापे (29), पियूष उर्फ दादू प्रकाश साळवे (30) दोन्ही रा. बारसेनगर, पाचपावली आणि गणेश उर्फ अण्णा आनंद बुरडे (41) रा. विटाभट्टी चौक, यशोधरानगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

फिर्यादी तुफानी कृपाशंकर शुक्ला (30) हे कळमना परिसरातील एका ट्रांस्पोर्ट कंपनीत काम करतात आणि तेथेच राहतात. गत 12 जूनच्या मध्यरात्री ते पाचपावलीच्या बारसेनगर परिसरात जेवणाच्या शोधात फिरत होते. दरम्यान वरील आरोपी त्यांना दिसले. त्यांनी आरोपींना आसपास एखादे हॉटेल किंवा खानावळ आहे का, अशी विचारणा केली. मदत करण्याऐवजी तिन्ही आरोपींनी शिविगाळ करीत त्यांच्याशी वाद घातला. मारहाण करून त्यांच्याजवळील रोख 5 हजार 600 रुपये आणि मोबाईल फोन असा एकूण 19,600 रुपयांचा माल लुटून पसार झाले. शुक्ला यांच्या तक्रारीवरून पाचपावली पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

मिळालेल्या माहितीच्या आधारावर तिन्ही आरोपींना अटक केली. चौकशीत तिघांनीही गुन्ह्याची कबुली दिली. पोलिस कोठडी घेऊन त्यांची सखोल चौकशी केली असता आरोपींनी पाचपावली ठाण्यांतर्गत वाहन चोरीचे दोन, यशोधरानगरात दोन आणि गणेशपेठ ठाण्यांतर्गत एक गुन्हा केल्याची माहिती दिली.

# शासन आणि लोकप्रतिनिधींनी एकत्र येत अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करावी : पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) टप्पा क्रमांक २.० या योजनेतील तांत्रिक अडचणी दूर करीत योजनेच्या ऑनलाईन नोंदणीला अधिक गती देण्याची गरज आहे. यासाठी प्रशासनाला लोकप्रतिनिधींनी सहकार्य करण्याचे आवाहन महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले.

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने आज रेशीमबाग येथील सुरेश भट सभागृहात एनएमआरडीए क्षेत्रातील सरपंच व ग्रामसेवकांसाठी प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) टप्पा क्रमांक २.० या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वित्त राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल, नासुप्र सभापती तथा एनएमआरडीए आयुक्त संजय मीणा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, एनएमआरडीए क्षेत्रातील सरपंच, ग्रामसेवक प्रामुख्याने उपस्थित होते.




### * सरपंच व ग्रामसेवकांसाठी कार्यशाळेचे आयोजन

मंत्री बावनकुळे पुढे म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) टप्पा क्रमांक २.० ही सर्वसामान्यांसाठी योजना शासनाने आणली आहे. त्यामुळे या योजनेची नोंदणी करताना येणा-या अडचणी दूर करण्यात याव्यात. यासाठी ग्रामपंचायत स्तरावर प्रशासन, सरपंच व ग्रामसेवकांच्या सहकार्याने नाव नोंदणीस गती देण्याचे आवाहन पालकमंत्री बावनकुळे यांनी यावेळी केले.

वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल म्हणाले की, सर्वांसाठी घरे ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवायची आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे स्वतःचे घराचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. जिल्ह्यात शंभर टक्के घरकुलाचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. सर्वसामान्य, दुर्गम माणसाच्या अडचणी दूर करायच्या आहेत. विविध योजना नागरिकांपर्यंत सहजतेने पोहोचण्याची गरज असल्याचे वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नासुप्र सभापती तथा एनएमआरडीए आयुक्त संजय मीणा यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील उद्देश सांगितला.

### उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींचा गौरव

जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) मध्ये उत्कृष्ट कार्य करणा-या नऊ ग्रामपंचायतींचा गौरव पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आला. यात मौदा तालुक्यातील वाकेश्वर, कोदामेंढी, सिरसोली,, कामठी तालुक्यातील महालगाव, उमरी, उमरेड तालुक्यातील सुरगाव कुही तालुक्यातील तितुर, सावनेर तालुक्यातील पिपळा डा.ब. तसेच पारशिवनी तालुक्यातील उमरी पाली या ग्रामपंचायतींच्या सरपंच आणि सचिवांना पालकमंत्र्याच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## भरधाव कारच्या धडकेत दुचाकी चालक गंभीर जखमी

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. १६ :



कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत नागपुर - जबलपुर बायपास रोड वरील बोर्डा टोल नाका जवळील डिवाईन रेस्टारेंट जवळ भरधाव कारच्या धडकेत दुचाकी वाहन चालक गंभीर जखमी झाल्याने पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहिती नुसार शनिवार (दि.१४) जुन रोजी सकाळी १०:३० ते ११:३० च्या दरम्यान रतिप गंगाधर शेंडे (३४ वर्ष) रा.खंडाळा घटाटे कन्हान यांचे भाऊ किरण गंगाधर शेंडे (३८ वर्ष) रा.खंडाळा घटाटे कन्हान हे आपल्या दुचाकी वाहन क्रमांक एम एच ४० टी ४२९७ ने बोर्डा टोल नाका जवळील डिवाईन रेस्टारेंट कडुन कामासाठी जात असतांना नागपुर - जबलपुर बायपास मार्गाने जबलपुर कडे जाणाऱ्या कार वाहन क्रमांक टीसीओ ८ ईपी १००१ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजी पणाने चालवुन दुचाकी वाहना ला मागुन जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकी वाहन चालक किरण शेंडे याचा डोक्याला, पायाला मार लागुन गंभीर जख्मी झाला.

सदर घटनेची माहिती कन्हान पोलीसांना मिळताच पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन जख्मी ला ॲम्बुलंस ने नागपुर येथील खाजगी रुग्णालयात उपचार कामी भर्ती केले असुन हालत चिंताजनक असल्याचे बोलले जात आहे. या प्रकरणी कन्हान पोलीसांनी रतिप शेंडे यांचा तक्रारी वरून आरोपी कार वाहन चालका विरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे.

## आणीबाणी व आपत्ती व्यवस्थापन विभागात मंजूर ५०० पदांपैकी केवळ ३७ फायरमन कार्यरत

■सुजाता बंडावार,
नागपूर, दि. १६ :

शहराच्या सुरक्षिततेसाठी व संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाच्या अशा मनपाच्या आणीबाणी व आपत्ती व्यवस्थापन विभागात गेल्या दीड ते दोन वर्षांपासून एकूण मंजूर 872 पदांपैकी केवळ 128 कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये अत्यंत जोखमीच्या कामासाठी लागणाऱ्या अग्निशामक विमोचकांची संख्या एकूण मंजूर 500 पदांपैकी केवळ 37 आहेत. यामुळे शहराची सुरक्षितता एरणीवर आली आहे.

नागपूर शहरात क्षेत्रफळ व लोकसंख्येच्या तुलनेत असलेले जुने 9 व नव्याने झालेले दोन असे 11 अग्निशामक केंद्र आहेत. यामध्ये कार्यरत कर्मचारी हे मंजूर पदाच्या 14 टक्केच असल्याने शहराची सुरक्षा ऐरणीवर आहे. कार्यरत नऊ अग्निशमन केंद्राप्रमाणे लागणाऱ्या बळसंख्येनुसारआणीबाणी व आपत्ती व्यवस्थापन विभागात मुख्य अग्निश मन अधिकारी यांचे पद रिक्त असून तुषार बाराहाते यांच्याकडे या पदाचा प्रभार देण्यात आलेला आहे. मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याचे 1 पद मंजूर आहे. उपमुख्य अग्निशमन अधिकारीचे मंजूर 1 पदापैकी 1 पद रिक्त आहे. विभागीय अग्निशमन अधिकारी यांचे दोन पदे मंजूर असून कार्यरत पदे दोन आहेत. सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी यांच्या मंजूर चार पदांपैकी तीन पदे रिक्त आहेत. अग्निशमन केंद्र अधिकारी यांचे 15 पदे मंजूर असून कार्यरत पद 1 आहे. सहाय्यक अग्निशामन केंद्र अधिकाऱ्यांची 39 पदे मंजूर असून सर्व पदे रिक्त आहेत. उप अग्निशमन अधिकारी यांची मंजूर पदे 39 आहे व कार्यरत पदे आठ आहे. प्रमुख अग्नीशामक विमोचकाची 81 पदे मंजूर असून केवळ 15 पदे कार्यरत आहे. चालक यंत्र- चालक यांची 162 पदे मंजूर असून कार्यरत पदे 59 आहेत. वाहन चालक (अग्निशमन) यांची 10 पदे मंजूर असून कार्यरत पदे 0 आहे. अग्निशामक विमोचक यांचे 500 पदे मंजूर असून त्यापैकी कार्यरत पदे केवळ 37 आहे. मुख्य मेकॅनिक कम ड्रायव्हर याचे एक पद मंजूर असून तेही रिक्त आहे. फिटर कम ड्रायव्हर यांची 15 पदे मंजूर असून केवळ पाच पदे कार्यरत आहेत. इलेक्ट्रिशियन चे दोन पदे मंजूर असून कार्यरत पद शून्य आहे. याप्रमाणे सर्व कर्मचारी मिळून 872 पदे मंजूर आहेत.

नऊ अग्निश मन केंद्र आपत्ती व्यवस्थापन कक्ष अग्निशमन प्रशिक्षण केंद्र यासाठी लागणारे मनुष्यबळ 611 आहे. आणि एकुण मंजूर पदाच्या कार्यरत पदे 128 आहेत. लागणाऱ्या मनुष्यबळाच्या तुलने रिक्त पदांची संख्या 483 आहे. एकुण पदांच्या तुलनेत कार्यरत पदांची संख्या केवळ 14 टक्के आहे. शहराच्या सुरक्षिततेसाठी व संरक्षणासाठी ही कर्मचारी संख्या फारच अपुरी असून ही परिस्थिती दीड ते दोन वर्षांपासून कायम आहे. त्यामुळे शहराच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आहे.

> मनपाच्या आणीबाणी व आपत्ती व्यवस्थापन विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या ही फार तोकडी आहे. कर्मचारी पदभरतीची मागणी मंत्रालयांमध्ये लावून धरलेली आहे पण ही बाब मंत्रालयात पेंडिंग आहे. पदभरती लवकरात लवकर व्हावी ही आमची देखील अपेक्षा आहे.
>
> **तुषार बाराहाते, प्रभारी मुख्य अग्निशामन अधिकारी**

## रोकडे ज्वेलर्सतर्फे जेम्सबॉन्ड मोहीम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

विदर्भातील विश्वासार्ह आणि प्रतिष्ठित नाव रोकडे ज्वेलर्स आपल्या ग्राहकांसाठी घेऊन आले आहेत. एक खास आणि आध्यात्मिकदृष्ट्या प्रभावी मोहीम रोकडे ज्वेलर्सतर्फे जेम्सबॉन्ड मोहीम – आरोग्य, संपत्ती आणि समृद्धीसोबतचा खास बंध जी ९ ते ३० जून २०२५ दरम्यान लक्ष्मीनगर व महाल शोरूममध्ये आयोजित केली जात आहे.

या अभियानामध्ये ग्राहकांना त्यांच्या कुंडलीनुसार योग्य रत्नांची निःशुल्क ज्योतिष सल्ला सेवा दिली जाईल आणि १००% प्रमाणित, अस्सल रत्ने निवडून दिली जातील, जी त्यांच्या जीवनातील अडचणी दूर करून सकारात्मक ऊर्जा निर्माण करू शकतात. जेम्सबॉन्ड हि मोहीम म्हणजे पारंपरिक ज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आमच्या विश्वासार्हतेचा संगम आहे. योग्य रत्नाचा स्पर्श एखाद्याचे आयुष्यच बदलू शकतो, असं मत व्यक्त केलं आहे राजेश रोकडे, संचालक, रोकडे ज्वेलर्स यांनी.



जेम्सबॉन्ड मोहिमेच्या वैशिष्ट्येः कुंडलीनुसार निःशुल्क ज्योतिष सल्ला वैयक्तिक गरजे नुसार रत्नांचा सल्ला ७ दिवसांची ट्रायल सुविधा (रत्न वापरून पाहण्याची संधी with 100% refunfd) प्रमाणित व अस्सल रत्ने उपलब्ध आरोग्य, करिअर, नातेसंबंध, पैसा किंवा मानसिक शांतता - कोणतीही अडचण असो, योग्य रत्न तुमचं नशीब उजळवू शकतं. ही संधी सोडू नका!

## होरपळल्याने मजुराचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

बोरिंगच्या कामादरम्यान पाईप आग लावून गरम करताना अचानक भडका झाल्याने गंभीररित्या जळून एका मजुराचा मृत्यू झाला. ही घटना एमआयडीसी पोलिस ठाण्यांतर्गत महाजनवाडी परिसरात घडली. कुवर उर्फ गोलू धनू धुर्वे (30) रा. जगला, बालाघाट असे मृताचे नाव आहे. गोलू हा बोरिंगचे काम करण्यासाठी नागपुरात आला होता. गत 6 जूनरोजी हिंगणा मार्गावर महाजनवाडी परिसरात बोरिंगचे काम सुरू होते. गोलूने आकार बदलण्यासाठी पाईपवर डिझेल ओतून आग लावली. या दरम्यान अचानक आगीचा भडका झाल्याने गोलू गंभीररित्या जळाला. त्याला उपचारार्थ जवळच्या रुग्णालयात भरती करण्यात आले. रविवारी त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी गोलूची आई ममताच्या तक्रारीवरून अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला.

## वेलतूर अंगणवाडी भरतीत मोठा घोटाळा उघड

■ गजानन लांजेवार, कुही, दि. १६ :

* विवाह नोंदणीमध्ये खाडाखोड करून दिले खोटे प्रमाणपत्र
* ग्रामविकास अधिकारीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

येथील अंगणवाडी मदतनीस भरती प्रक्रियेत एकाचवेळी राजकीय हस्तक्षेप, आर्थिक व्यवहार आणि दस्तऐवज खोटारडेपणा या सर्वांचा स्फोट झाला आहे. या भरती प्रक्रियेतील ग्रामविकास अधिकारी योगेश भिमटे, ज्यांनी विवाह नोंदणी रजिस्टरमध्ये खोडतोड करून बनावट विवाह प्रमाणपत्र तयार केले असा गंभीर आरोप ग्रामपंचायत सदस्य सुभाष मेश्राम यांनी केला आहे.

### खोडतोडीचा थरार एकाच अनुक्रमांकावर दोन विवाह नोंद

अर्जदार प्रतिक्षा बबन तिजारे यांनी वेलतूर येथील अंगणवाडी मदतनीस पदासाठी अर्ज सादर केला होता. प्रत्यक्षात त्या मूळच्या मू. पो. हरदोली येथील रहिवासी असूनही, त्यांना वेलतूर येथील स्थानिक दाखवण्यासाठी विवाह नोंदणीमध्ये खोडतोड करण्यात आली. 2018 च्या सिरीज मध्ये 2013 साल ची नोंद रजिस्टरच्या सर्वात खाली रिकामी जागा असलेल्या ठिकाणी करण्यात आली. नोंद क्रमांक १२३ हा दोन व्यक्तींसाठी वापरण्यात आला असून, एकाच पानावर दोन वेगवेगळी हस्ताक्षरे आणि पांढऱ्या शाईचा वापर झाल्याचे स्पष्ट पुरावे सुभाष मेश्राम यांनी सादर केले.

### शासन नियम धाब्यावर...

भरती प्रक्रियेत प्रथम क्रमांकावर असलेल्या प्रतिक्षा तिजारे यांच्या शैक्षणिक कागदपत्रांवर आक्षेप असूनही त्यांची निवड करण्यात आली, तर दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या चांदणी सुभाष मेश्राम यांना डावलण्यात आले. चांदणी यांनी वेळेत व नियमबद्ध सर्व कागदपत्र सादर करूनही त्यांची दखल घेण्यात आली नाही.विशेष म्हणजे, ही काही पहिली वेळ नाही या अगोदर झालेल्या आशा वर्कर भरतीतसुद्धा चांदणी मेश्राम यांना सर्वाधिक गुण असूनही त्यांना डावलून कमी गुण मिळवणाऱ्या उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली होती.आता पुन्हा एकदा अंगणवाडी मदतनीस भरतीत त्यांच्यावर अन्याय झाल्यामुळे प्रश्न उपस्थित होत आहे. चांदणी मेश्राम यांना कितीवेळा, किती पटीने अन्याय सहन करावा लागणार?

### भरतीत लाखोंच्या उलाढालीचा संशय..

स्थानिक स्तरावर चर्चा आहे की, या भरतीमध्ये मोठी आर्थिक उलाढाल आणि स्थानिक राजकीय हस्तक्षेप झाला आहे. चांदणी मेश्राम यांना डावलून प्रतिक्षा तिजारे यांना वर आणण्यामागे पैशांची देवाणघेवाण आणि राजकीय शिफारसी कार्यरत होत्या, अशी जोरदार चर्चा आहे.

### चौकशीची मागणी आणि शासन दरबारी धडक..

या सगळ्या प्रकारामुळे संतप्त चांदणी मेश्राम यांनी ग्रामसेवक, बीडीओ, सीईओ ते आयुक्तांपर्यंत तक्रारी केल्या असून, अजूनही कोणतीही चौकशी सुरू झाली नाही. त्यामुळे आता प्रकरण थेट जिल्हाधिकारी आणि महसूल मंत्री यांच्याकडे नेण्याचा इशारा देण्यात आला आहे.

वेलतूरच्या अंगणवाडी भरतीत फक्त अपात्र उमेदवारालाच संधी दिली गेली नाही, तर शासनाच्या विश्वासाचे आणि लोकशाही प्रक्रियेचेही शिरकाण करण्यात आले.

### ह्या आहेत मागण्या ...

* प्रतिक्षा तिजारे यांच्या खोट्या विवाह व शैक्षणिक कागदपत्रांची चौकशी करावी
* विवाह नोंदणी रजिस्टरमध्ये खोडतोड करणाऱ्या ग्रामविकास अधिकारी योगेश भिमटे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा
* भरती प्रक्रियेत अपात्र ठरवलेली चांदणी मेश्राम यांना न्याय मिळावा व नियुक्ती द्यावी
* संपूर्ण भरती प्रक्रियेवर त्यांनी सादर केलेल्या शैक्षणिक विवाह नोंद राशन कार्ड वरील नाव या सर्व साक्षांवर आधारित स्वतंत्र चौकशी व्हावी.

> मी नियमीत आणि पात्र असूनही मला दुसऱ्यांदा डावलले जात आहे. एकदा आशा वर्कर भरतीत, आणि आता अंगणवाडी मदतनीस भरतीत. दोन्ही वेळा माज्या गुणांची पायमल्ली करून, बनावट कागदपत्रांवर नियुक्त्या करण्यात आल्या. नियम काय फक्त गरीबांसाठी आहेत का? खरेदी केलेल्या नियुक्त्या रद्द करा, नाहीतर हा आवाज जिल्हाधिकारी, आयुक्त, तेथून थेट मंत्रालयापर्यंत पोहोचवला जाईल. मला न्याय न मिळाल्यास आमरण उपोषण केले जाईल.
>
> **चांदनी सुभाष मेश्राम**

## रानडुकराच्या हल्ल्यात शेतमजूर गंभीर जखमी

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. १६ :

दि.१५ जून ला रविवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास शेतात काम करीत असलेल्या जितेंद्र सिद्धार्थ, वय २१वर्ष, रा. रामटेक या शेतमजुरावर रानडुकराने हल्ला चढवून गंभीर जखमी केले. रामटेक-हिवरा मार्गावरील बबनराव कोठेकर यांच्या शेतात जितेंद्र हा शेतीचे काम करीत होता. अचानक रानडुकराने त्याच्यावर हल्ला चढविला. या हल्ल्यात जितेंद्रचे डोके व हाताला गंभीर दुखापत झाली आहे. त्याच्या डाव्या हाताची नस कापल्या गेल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. हल्ल्यामुळे तो जागेवर बेशुद्ध पडला. जितेंद्रचा आवाज ऐकून शेतात काम करणाऱ्या इतर मजुरांनी घटनास्थळाकडे धाव घेतली.तत्काळ जखमी जितेंद्रला रामटेक येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, अधिक रक्तस्त्राव झाल्यामुळे त्याला पुढील उपचारार्थ नागपुरातील मेडिकल हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले आहे.



## प्रधानमंत्री 'सूर्यघर' योजनेत नागपूर जिल्ह्याची गगनभरारी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

देशाचे ऊर्जा भविष्य उज्वल करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत, प्रधानमंत्री 'सूर्यघर' - मोफत वीज योजना महाराष्ट्रात वेगाने आकार घेत आहे. या योजनेत नागपूर जिल्ह्याने अक्षरशः नेतृत्व स्वीकारले असून, सौर ऊर्जा निर्मितीत जिल्ह्याने राज्यात सर्वोत्कृष्ट कामगिरी नोंदवत आपली आघाडी कायम ठेवली आहे.

नवीनतम आकडेवारीनुसार, १५ जून २०२५ रोजीपर्यंत नागपूर जिल्ह्याने तब्बल ३३,६४१ छतावरील सौर ऊर्जा निर्मिती संच यशस्वीरित्या स्थापित केले आहेत. ही संख्या राज्यातील इतर कोणत्याही जिल्ह्यापेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे. या संचांमधून १३२.३५ मेगावॅट अपारंपरिक ऊर्जा निर्माण करण्याची प्रचंड क्षमता जिल्ह्याने विकसित केली आहे, जी राज्याच्या एकूण क्षमतेत महत्त्वपूर्ण योगदान



देत आहे. राज्यात महावितरणच्या अधिनस्थ असलेल्या भागांत तब्बल २,१२,६४० सौर ऊर्जा निर्मिती संच स्थापित झाले आहेत, ज्यांची एकूण स्थापित वीज निर्मिती क्षमता ८१२.७६ मेगावॅट अपारंपरिक ऊर्जा निर्मिती आहे.

या योजनेच्या माध्यमातून घराघरात स्वच्छ आणि स्वस्त वीज पोहोचवण्याच्या सरकारच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टात नागपूर जिल्हा अग्रेसर आहे. विशेष म्हणजे, १५ जून २०२५ रोजी एकाच दिवसात नागपूरमध्ये १२४ नवीन सौर वीज निर्मिती संच उभारण्यात आले, ज्यांची स्थापित वीज निर्मिती क्षमता ४५२.४४ किलोवॅट आहे. हा आकडा एकट्या नागपूरने एका दिवसात उभारलेल्या क्षमतेचे निदर्शक आहे, जे या योजनेच्या अंमलबजावणीतील जिल्ह्याच्या प्रभावी गतीला अधोरेखित करते.

या आकडेवारीनुसार, जळगाव, पुणे, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या प्रमुख जिल्ह्यांच्या तुलनेत नागपूरने मोठी आघाडी घेतली आहे. जिथे जळगावमध्ये १५,८६८ आणि पुण्यात १५,६३२ वीज निर्मिती संच उभारले गेले आहेत, तिथे नागपूरने या दोघांच्या एकत्रित संख्येपेक्षाही अधिक संच उभारले आहेत. महावितरणच्या नागपूर परिक्षेत्रातील इतर जिल्ह्यात देखील सौर ऊर्जा निर्मिती संच उभारणीत चांगली कामगिरी केली आहे. यात अमरावतीमध्ये १२,३३१, वर्धा जिल्ह्यात ६,३७६, बुलढाण्यात ६,२३२, अकोलामध्ये ६,१३०, चंद्रपुरात ५,६१६, यवतमाळमध्ये ४,९९८, भंडारा जिल्ह्यात ३,५९१, वाशिममध्ये २,५६२, गोंदिया जिल्ह्यात २,५११ तर गडचिरोलीमध्ये १,१४१ संच उभारले गेले आहेत. १५ जून २०२५ रोजी एकाच दिवसात वर्धा जिल्ह्यात ७० नवीन सौर वीज निर्मिती संच उभारण्यात आले, ज्यांची स्थापित वीज निर्मिती क्षमता २४१.७ किलोवॅट आहे.

नागपूरच्या या यशामागे नागरिकांचा वाढता सहभाग, स्थानिक प्रशासनाचे प्रभावी नियोजन आणि योजनेच्या लाभांची योग्य माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न कारणीभूत आहेत. यामुळे केवळ विजेच्या खर्चात बचतच होत नाही, तर पर्यावरणाची देखील काळजी घेतली जात आहे. प्रधानमंत्री 'सूर्यघर' योजनेमुळे नागपूरकर आता खऱ्या अर्थाने 'सूर्यशक्ती' चा अनुभव घेत आहेत आणि हरित भविष्याच्या दिशेने एक नवा अध्याय लिहित आहेत. भविष्यातही नागपूर जिल्हा याच वेगाने सौर ऊर्जा क्षेत्रात प्रगती करेल आणि देशाला ऊर्जा आत्मनिर्भर बनवण्यात सिंहाचा वाटा उचलेल अशी अपेक्षा आहे. आपणही या अभियानाचा भाग होऊन आपल्या घराच्या छतावर सौर ऊर्जा संच स्थापित करून वीज बचतीसोबतच पर्यावरण संवर्धनात हातभार लावू शकता.

## गौरखेडे कॉम्प्लेक्स आणि दवाबाजार परिसरात आज सकाळी वीज नाही

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

मंगळवार, 17 जून रोजी सेमिनेरी हिल्स शाखा कार्यालया अंतर्गत गौरखेडे कॉम्प्लेक्स आणि गांधीबाग शाखा कार्याल्या अंतर्गत दवाबाजार परिसरासह आसपासच्या काही भागांमध्ये वीजपुरवठा खंडित राहणार आहे.

मान्सूनपूर्व दुरुस्तीची कामे आणि नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्याच्या कामांमुळे महावितरणने हा निर्णय घेतला आहे. नागरिकांना होणार गैरसोयीबद्दल महावितरणने दिलगिरी व्यक्त करत सहकायाचे आवाहन केलं आहे. सेमिनरी हिल्स शाखेअंतर्गत येणाऱ्या 11 केव्ही गौरखेडे कॉम्प्लेक्स वीज वाहिनीवरील वीजपुरवठा सकाळी 8 ते 11 या वेळेत बंद राहील.

यामुळे या वाहिनीवरील गौरखेडे कॉम्प्लेक्स, हिंगोली बिका सोसायटी, फ्रेंड्स कॉलनी, फाळके ले-आउट, कोलबास्वामी सोसायटी आणि नेताजी सोसायटी या भागांतील वीजपुरवठा बंद राहील गांधीबाग शाखेअंतर्गत येणाऱ्या 11 केव्ही दवाबाजार वीज वाहिनीवरील वीजपुरवठा सकाळी 8.30 ते दुपारी 1 या काळात बंद ठेवण्यात येईल. यामुळे दवाबाजार, छोटा लोहारपुरा, हॉटेल पाल पॅलेस, तिडके भवन, हज हाऊस, शौकत अली चौक, शब्बानी क्लब, सीए रोड, कचराघर आणि आर्य समाज मंदिर या परिसरातील वीजपुरवठा बंद राहील.

महावितरणने ग्राहकांना आवाहन केले आहे की, या काळात पाणी, लिफ्ट अशा अत्याआवश्यक कामांचे नियोजन आधीच करून ठेवावे. तसेच, गैरसोयीबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे.

# तीव्र उष्णतेमुळे नागरिकांना द्यावे लागत आहे समस्यांना तोंड

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १६ :

नवतापच्या वेळी जेवढी उष्णता होती तेवढीच आताही तापत आहे. प्रचंड उष्णता आहे. कुलर आणि पंखेही काम करत नाहीत. नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने आणि ते कुठून भरायचे म्हणून कुलर चालवणे देखील एक समस्या आहे. कडक उन्हामुळे आणि अनियमित पाणीपुरवठ्यामुळे लोकांना आधीच अडचणी येत होत्या. त्यांना आशा होती की मृग नक्षत्रानंतर पाऊस पडेल आणि मुसळधार पाऊस काही प्रमाणात आराम देईल. परंतु अद्याप पाऊस सुरू झालेला नाही आणि लोक चिंतेत आहेत. आता लोक फक्त म्हणत आहेत, बरखा राणी, कृपया मुसळधार पाऊस पडा. कडक उन्हामुळे लहान मुले, वृद्धांपासून ते रुग्णांपर्यंत सर्वांनाच अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. हिंगणा-रायपुर रस्त्यालगतच्या वस्त्यांमध्ये, हिंगणा, धनकरपुरा, भोसलेवाडी आणि ग्रामीण भागात कडक उन्हामुळे लोक त्रस्त आहेत.

नक्षत्रात पाऊस नसल्याने हिंगणा, रायपुर वाना डोंगरी येथील नागरिक त्रस्त आहेत. कडक उन्हामुळे लोकांना समस्यांना तोंड द्यावे लागत आहे आणि आजारांचा धोका वाढला आहे. उष्णतेमुळे लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. लोकांना उष्णतेशी संबंधित आजार, डिहायड्रेशन आणि थकवा यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. लोकांना त्यांच्या दैनंदिन जीवनातही समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

**हवामान बदलामुळे आजारांचा धोका वाढला**

उष्णता आणि पावसाअभावी आजारांचा धोका वाढला आहे. मलेरिया, अतिसार आणि इतर जलजन्य आजारांचा धोका वाढला आहे. लोकांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी.

या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाने पावले उचलण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. हिंगणा धनकरपुरा परिसरात तीव्र उष्णतेमुळे नागरिकांना समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. शहराचे तापमान सतत वाढत आहे, ज्यामुळे लोकांना उष्णतेच्या लाटा आणि उष्ण हवेचा सामना करावा लागत आहे. वीज संकट आणि पाण्याच्या कमतरतेमुळे ही समस्या आणखी वाढली आहे. पावसाअभावी परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. नागपूर हे भारतातील सर्वात उष्ण शहर आहे.

जून महिन्यात दिवसाचे तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त राहते असे या शहरात म्हटले जाते. शहराचे भौगोलिक स्थान आणि अनियंत्रित शहरीकरणामुळे ही समस्या वाढली आहे.

## नागरिकांनी वृक्षारोपणावर भर द्यावा: सरनाईक



हिंगणा नगरपंचायतीचे प्रशासक आणि मुख्याधिकारी धनंजय सरनाईक म्हणाले की, वाढते तापमान, पाऊस न पडणे आणि वेळेवर पाऊस पडणे हे पर्यावरणाचे असंतुलन आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी हिंगणा नगरपंचायतकडून वृक्षारोपणाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. त्याचप्रमाणे नागरिकांनीही वृक्षारोपणाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. झाडे थंड, थंड हवा, फळे देखील देतील, त्यामुळे पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होईल आणि पावसाळ्यातही खूप फरक पडेल. वेळेवर पाऊस पडल्याने लोकांना दिलासा मिळेल. प्रशासक सरनाईक म्हणाले की, भविष्यात अधिक उष्णता आणि पावसाचा अभाव टाळण्यासाठी लोकांनी आत्तापासूनच वृक्षारोपणाकडे विशेष लक्ष द्यावे आणि आजपासूनच झाडे लावण्याची प्रतिज्ञा घ्यावी आणि त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या वाढदिवस आणि स्मृतिदिनी झाडे लावावीत आणि त्यांच्या काळजीकडे विशेष लक्ष द्यावे.

## माधवबागकडून ज्येष्ठांची आरोग्य तपासणी
# बेला येथे ज्येष्ठ नागरिक मंडळात सभा

■ महासागर प्रतिनिधी
बेला, दि. १६ :



कोंढाळी येथील माधवबाग रुग्णालयाचे वतीने बेला येथील वृद्ध ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी 20 जूनला करण्यात येणार आहे. या संदर्भात ज्येष्ठ नागरिक मंडळाचे कार्यालयात नुकतीच सभा पार पडली. यावेळी माधवबाग रुग्णालयाच्या फार्मासिस्ट किरण तागडे यांनी मौलिक मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष शरदचंद्र नाईकवाडे होते. यावेळी नागपूर येथील दिव्यांग संस्थेच्या अधीक्षक सुरेखा किशोर कळंबे प्रामुख्याने उपस्थित होत्या.

शुक्रवारला पार पडलेल्या सभेत 27 स्त्री-पुरुष ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्य तपासणीसाठी नोंदणी केली आहे. त्यांची केवळ 500 रुपये नाममात्र शुल्कात हृदय, रक्तदाब, मधुमेह व पंचकर्म आरोग्य तपासणी करून रोग निदान केल्या जाणार आहे. व रुग्णांवर पुढील उपचार सवलतीत होणार आहे.यामध्ये त्यांना चहा,नाश्ता, जेवण व बेला येथून ने आण करण्याची व्यवस्था माधवबाग रुग्णालयाचे वतीने करण्यात येणार आहे.

सभेला ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अशोक नकले,यादवराव भनारकर, माजी सरपंच शंकरराव गेडेकर दादा खोडे महादेव डेकटे कृष्णा हेडाऊ, निवृत्त शिक्षक ज्ञानेश्वर ठोंबरे, माजी ग्रा.पं सदस्य पुष्पा ठोंबरे, आशा मेंढुले,शोभा मेंढुले, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विनायक देशमुख व इतर अनेक पदाधिकारी, सभासद उपस्थित होते. यशवंत डेकाटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मालमत्ता कर शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :




आशीनगर झोन क्रं ९ व धंतोली झोन क्रं ४ , मालमत्ता कर विभाग द्वारा अनक्रमे धम्मदीप नगर व धंतोली उद्यान येथे शिबीर आयोजित करुन आनलाईन सुविधातंर्गत अनुक्रमे ७८ मालत्ताधारकाकडून रु १.२० लक्ष व ३० मालमत्ताधारकाकडून रु ०.५४ लक्ष रक्कम म न पा निधीत जमा करुन घेतले. मागील आर्थिक वर्षात १३ जुन पर्यंत रु ३८.३५ कोटी मालमत्ता कर रक्कम म न पा निधीत जमा झाले होते व चालू आर्थिक वर्षात १३ जून पर्यन्त रु ४८.३६ कोटी मालमत्ता कर रक्कम १२३४०२ मालमत्ताधारकानी मनपा निधित जमा झालेले आहेत. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत रु १० कोटी रक्कमेची वाढ असुन टक्केवारी मध्ये २६ % वाढ आहे. रु. ४८.३६ कोटी रक्कम पैकी रु २६ कोटी आनलाईन सुविधेचा वापर करुन ५५४७६ मालमत्ताधारकानी घरी/ कार्यस्थलावरुन म न पा निधित जमा केले आहेत व मालमत्ता कर रक्कमेत १५ % सुट प्राप्त करुन रु २.९३ कोटी रक्कमेची लाभ घेतलेला आहे. तर रु २२ कोटी मालमत्ता कर रक्कम वसुली केंद्रावर जावून ६७०२३ मालमत्ता धारकानी म न पा निधित जमा केली आहे. ५०% पेक्षा जास्त मालमत्ता कर रक्कम आनलाईन सुविधातंर्गत प्राप्त झालेली आहे. आयुक्त मनपा यांचे मार्गदर्शनाखाली व मा. अति आयुक्त (सेवा) यांचे नेतृत्वात मालमत्ता कर विभाग मुख्यालय व झोन स्तरावरील यंत्रणा आठवड्याचे सातही दिवस कार्यरत राहूनमालमत्ताधारकाच्या दारात पोहचून, क्षेत्रात पोहचून मालमत्ता कर आय चे उद्दिष्ठ गाठण्याचा संकल्प घेतलेला आहे.

नागरीकाना आवाहन करण्यात येत आहे कि मालमत्ता कर निहीत कालावधीच्या आत म न पा निधित जमा करा व स्थावर मालमत्तेची जप्ती व अटकावणी च्या कार्यवाही पासून वाचा

# सूफी बाबा शाह कलंदर यांचा जन्मदिन उत्साहात



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :

सुप्रसिद्ध सूफी संत सूफी बाबा शाह कलंदर यांचा जन्मदिन रविवार, १५ जून रोजी राष्ट्रभाषा भवन, सीताबर्डी येथील समर्थगुरु धारा ध्यान केंद्रात उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात सूफी ऊर्जेच्या माध्यमातून सामूहिक ध्यान साधना करण्यात आली. समर्थगुरु धारा राज्य संयोजक आचार्य दिवाकर पाटने आणि माँ ज्योती बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे संचालन पार पडले. आचार्य दिवाकर पाटने यांनी सर्व उपस्थितांना सूफी संतांचे कार्य, विचारधारा आणि त्यांच्या दिव्य शक्तींविषयी माहिती दिली. आयोजनासाठी स्वामी मयूरेश, स्वामी पवनकर, स्वामी मानकर, प्रकाश खोब्रागडे, आचार्य महेंद्र नागपाल व आचार्य हरिदर्शन बागडे यांनी सहकार्य केले.

# रामटेक येथे मनसे प्रमुख राज ठाकरे यांचा वाढदिवस साजरा



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १६ :

महाराष्ट्र नवनिर्माण सेना संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रामटेक विधानसभेत सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. मनसे जिल्हाध्यक्ष शेखर भाऊ दुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत रामटेक येथील वृद्धाश्रम आणि उपजिल्हा रुग्णालय येथे अन्नदान व फळ वाटप करण्यात आले.

या उपक्रमाद्वारे मनसे प्रमुख राज ठाकरे यांना दीघार्युष्य आणि उत्तम आरोग्य लाभो, अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली.हा उपक्रम समाजाप्रती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची बांधिलकी दर्शवणारा होता.

# भूषण जाधव यांना विदर्भ गौरव पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

गायक भूषण जाधव यांना विदर्भ गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार वीर शिव छत्रपती संघटना, एस.आर. एन. फिल्म प्रोडक्शन, न्यूज इंडिया 24, यांच्या संयुक्त विद्यमाने राजे मुधोजी भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाला अभिनेता सागर निकम, दिग्दर्शक, निमार्ते मधुर भांडारकर उपस्थित होते. यापूर्वी भूषण जाधव यांना झी युवा संगीत सम्राट, ई टीव्ही भारतचा संगीत सन्मान, मराठा भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. विदर्भातील कलावंतांना वैदर्भीय भूमीतच प्रोत्साहन मिळाले पाहिजे. त्यासाठी असे आयोजन, प्रोत्साहन प्रेरक, पोषक ठरते, असे मनोगत भूषण जाधव यांनी व्यक्त केले.

# नागपूरचा गट पोहचला ख्वाजा गरीब नवाज परिषदेत



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

खानकाहे हामीदियाचा एक गट नागपूरहून अजमेरला पोहोचला. खानकाहे हामीदिया भालदारपुराचे संयोग अमजद खान म्हणाले की, नागपूर आणि संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो लोक अजमेरला पोहोचले. हजरत ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती यांच्या दरबारात चादर सादर करण्यात आली. आणि त्यानंतर आध्यात्मिक धार्मिक गुरु हजरत डॉ. शाह झाकीर हमीद यांनी परिषदेला संबोधित केले.

गरीब नवाज परिषदेत महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा, कर्नाटक येथील शेकडो खुलाफा हजरत आणि पीर भाई उपस्थित होते. परिषदेचे आयोजन अज्जीभाई यांनी केले होते.

सलमान चिश्ती आणि अझहर चिश्ती यांनी शाह सलीम चिश्ती, हजरत दानिश अली शाह (नायब सज्जादानशीन नशीन कलाम शरीफ), तस्लीम आरिफ, युसुफ अली शाह, बिस्मिल्ला शाह यांचे पगडी घालून स्वागत केले. फिरोज भाई वतन, अमजद खान, आबिद अली शाह, इरफान अली शाह, सलीम भाई चादरवाले, हाफिज अली शाह, हबीब अजमेरी, अख्तर कव्वाल, रफिक अली शाह, अमन शेख, खुलाफा हजरत यांच्यासह देशाच्या विविध भागातून संमेलनात आले आणि कार्यक्रमाचा एक भाग बनले.

# वारकरी अध्यात्मिक बालसंस्कार शिबीर उत्साहात संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :



वारकरी मंच महाराष्ट्र राज्य नागपूर शहर आयोजित 27 दिवसीय वारकरी अध्यात्मिक बालसंस्कार शिबिर भरघोस प्रतिसादात व उत्साहात संपन्न झाले. समारोपीय सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून गुणवंत पाटील, संदीप कोहळे, ज्ञानेश्वर टोंगे, शशांक भुरे, ह. भ. प. कुणाल फुलझेले, चारुदत्त कलंबे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

27 दिवसीय वारकरी आध्यात्मिक बालसंस्कार शिबिर 2025 मध्ये बालकांना सर्व देवी देवतांचे मंत्र व स्तोत्र, जन्मदिन गीते, योग संस्कार, वारकरी संप्रदायाचा अभ्यास, मुलींसाठी लाठीकाठी, मुलांसाठी रायफल शूटिंग इत्यादीचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच या शिबिरात संरक्षणम सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचीन नाणी व वस्तूंचे अनोखे प्रदर्शन भरविण्यात आले. यासोबतच चित्रकला स्पर्धा, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवविण्याचे उपक्रम घेण्यात आले. शिबिरामध्ये मार्गदर्शकांचे उचित मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. समरूपतीय कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. या शिबिराचे प्रथम पारितोषिक श्लोक लांजेवर, द्वितीय पारितोषिक अयान हाडके, तृतीय पारितोषिक मनस्वी साटकर यांना प्रदान करण्यात आले.

यावेळी कोषाध्यक्ष तेजस घोडे, अमेय कुळकर्णी, सोहम पालोदे, रोहित बुधे, मानस रोडे, ओम डांगोरे, नैतिक पाटील, रुद्र बोंद्रे, भावेश बुरिले, दुष्यंत जुनघरे, नकुला पिंपळापुरे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# स्वप्नपूर्तीसाठी रोडमॅप तयार करा : विनोद साबू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :



स्वप्ने साध्य करण्यासाठी प्रथम त्या स्वप्नांपर्यन्त पोचविणारा रस्ता अर्थात रोडमॅप तयार करा,असा सल्ला साबू प्लास्टिक प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक विनोद साबू यांनी दिला.

नागपूरच्या सिव्हिल लाईन्स येथील चिटणवीस सेंटर येथे विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशनने आयोजित केलेल्या कमी भांडवल- मोठी स्वप्ने या सत्रात उद्योजकांना संबोधित करताना ते बोलत होते. स्पष्ट रोडमॅपने सुरुवात केल्याने एका निश्चित वेळेत स्वप्ने साध्य होण्यास मदत होते, असे ते म्हणाले. नवोदित उद्योजकांशी, विशेषतः ज्यांची मोठी स्वप्ने आहेत पण मर्यादित संसाधने आहेत, त्यांनी व्यावहारिक आणि वास्तववादी रहावे असे ते म्हणाले. कुटुंब हे आपली पहिली आणि सर्वात मजबूत आधार प्रणाली असते. कुटुंबाकडून - भावनिक आणि आर्थिकदृष्ट्या - पाठिंबा मिळवणे, महत्वाचे असल्याचे ते म्हणाले.

# विधानभवनाच्या इमारतीसाठी मुद्रणालयाची जागा मिळणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

विधानभवन विस्तारीकरणाच्या अंतर्गत विधिमंडळ सचिवालयाच्या कामकाजासाठी ग्रंथालयाची ९ हजार ६७० चौ.मी. जागा महसूल विभागाकडे हस्तांतरित केली आहे. त्या बदल्यात मुद्रणालयाला त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या जागेवरच शासनाकडून पुनर्विकास करून दिल्या जाणार आहे. शासकीय आणि पुरवठा विभाग यांच्यामध्ये काही दिवसांपासून सुरु असलेला वाद आता संपुष्टात आला आहे.हिवाळी अधिवेशनासाठी विधानभवनात ५०० आसन क्षमतेचे विधानभवन उभारले जाणार आहे. तसेच विधीमंडळ अधिकारी व विधानभवनाच्या कामकाजासाठी शासकीय मुद्रणालयाच्या जागेचा उपयोग केल्या जाणार आहे. उद्योग विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या मुद्रणालयाच्या १६ हजार १८२ चौ.मी. जागेपैकी ९६७० चौ.मी. विधानभवनाला देण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला. सभापती राम शिंदे यांनी २१ एप्रिल रोजी विधानभवन येथे आढावा बैठक घेतली होती.

# ऑरेंज टायग्रेसेस महिला संघाने जिंकला व्हीपीटीएल चषक



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियम, जामठा येथे खेळल्या गेलेल्या अंतिम ऑरेंज टायग्रेसेस महिला संघाने टायटन्स महिला संघाचा १६ धावांनी पराभव करून विदर्भ महिला प्रो टी२० २०२५ चे विजेतेपद पटकावले.

अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, ऑरेंज टायग्रेसेस महिला संघाची कर्णधार दिशा कासट आणि सायली शिंदे यांनी डावाला सुरुवात केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ३५ धावांची भागीदारी केली, १९ चेंडूत १२ काढून शिंदे बाद झाली. दिशा कासटने ४५ चेंडूत ४२ धावांची महत्त्वाची खेळी केली. संघाची स्टार फलंदाज अंकिता सुधीर भोंगाडेने ३३ चेंडूत जलद ५० धावा केल्या. सई भोयरने ११ चेंडूत १३ धावांचे योगदान दिले.

पहिल्या डावाच्या शेवटी ऑरेंज टायग्रेसेस महिला संघाने २० षटकांत ७ बाद १३६ धावा, नागपूर टायटन्स संघाकडून आरती बहरवाल (२/२२) आणि धारावी टेंभुर्णे (२/२९) यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले, तर रुखसार अन्सारी (१/२९) आणि मोना मेश्राम (१/८) यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

१३७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, नागपूर टायटन्स महिला संघाची सुरुवात खूपच खराब झाली आणि संघ फक्त ५.४ षटकांत २५/६ असा संघर्ष होता. आरती बहरवाल आणि धारावी टेंभुर्णे यांनी सातव्या विकेटसाठी ५१ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. आरतीने २७ चेंडूत २६ धावा केल्या, तर धारावीने २६ चेंडूत २५ धावा केल्या. डावाच्या शेवटच्या षटकांमध्ये मानसी बोरीकरने १८ चेंडूत २३ धावा केल्या आणि गार्गी सुनील वनकर १६ चेंडूत १५ धावा करून नाबाद राहिली. संघाने ९ बाद १२० धावा केल्या आणि सामना १६ धावांनी गमावला.

ऑरेंज टायग्रेस महिला संघाकडून कोमल झंझाड सर्वात यशस्वी गोलंदाज ठरली. तिने ४ षटकांत १७ धावा देत ४ बळी घेतले. तृप्ती लोधे (१/२६), जान्हवी रंगनाथन (१/२६) आणि अदिती पलांदूरकर (१/२३) यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. उर्वरित बळी धावबाद ठरले.

# नागपूर स्थानकावरील डब्ल्यूडब्ल्यू-३ बेसमेंट पार्किंग बांधकामात महत्त्वपूर्ण टप्पा गाठला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :



मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात नागपूर रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासाचे कार्य वेगाने सुरू आहे. या अंतर्गत, पश्चिम विंग-3 (डब्ल्यूडब्ल्यू-3) बेसमेंट पार्किंग स्ट्रक्चरच्या बांधकामात एक मोठी उपलब्धी नोंदवण्यात आली आहे. ही सुविधा स्थानकाच्या आधुनिकीकरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे, ज्याचा उद्देश प्रवाशांच्या सोयीसाठी पायाभूत सुविधा वाढवणे आणि गर्दी कमी करणे आहे.

या प्रकल्पाची अंमलबजावणी दोन टप्प्यांमध्ये होत आहे. टप्पा-1 (1800 चौरस मीटर क्षेत्रफळ) चे बांधकाम पूर्ण होऊन सप्टेंबर 2024 मध्ये विभागाला सुपूर्द करण्यात आले होते. सध्या याचा वापर पृष्ठभागीय पार्किंगसाठी केला जात आहे. यासोबतच, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, प्लंबिंग आणि फायरफायटिंग व अंतर्गत सजावटकामे सुरू आहेत.

टप्पा-2 (1620 चौरस मीटर क्षेत्रफळ) मध्ये खोदकाम व पाया घालण्याचे कार्य पूर्ण झाले असून बेसमेंट स्लॅबचे सुमारे 90% काँक्रीटीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरित 10% क्षेत्रासाठी सेंट्रींगचे काम सुरू आहे. हा टप्पा पूर्ण झाल्यानंतर पृष्ठभागावरील गर्दी कमी होईल आणि प्रवाशांना आधुनिक व प्रशस्त पार्किंग सुविधा मिळेल.

ही प्रगती ही मध्य रेल्वेच्या स्मार्ट, कार्यक्षम व प्रवासी-केंद्रित पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या बांधिलकीचे प्रतीक आहे, ज्याद्वारे नागपूर स्थानकाला भविष्यकालीन रेल्वे हब म्हणून उभारले जात आहे.

# सोयाबीन पिकावरील खोडमाशीचे बिज प्रक्रियेद्वारे व्यवस्थापन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

विदर्भात सोयाबीन पिकाची मोठ्या प्रमाणावर लागवड होते. पेरणीनंतर प्रामुख्याने खोड माशीचा रोपावस्थेत प्रादुर्भाव होत असल्यामुळे हंगामाच्या सुरुवातीपासूनच या किडीच्या व्यवस्थापनासाठी बिज प्रक्रिया करुनच लागवड करावी, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाटगे यांनी केले आहे. या किडीचा प्रादुर्भाव पिकाचे रोपावस्थेपासूनच म्हणजेच रोप 10 ते 15 दिवसाचे झाल्यानंतर होतो. त्यामुळे त्याचा ताटाचे संख्येवर विपरीत परिणाम होऊन पिकाची दुबार पेरणीची शक्यता असते. मात्र बिजप्रक्रिया केल्यास सोयाबीनचे पिक जवळपास 25 ते 30 दिवसांपर्यंत या किडीस कमी प्रमाणात बळी पडते.

खोडमाशी लहान, चमकदार काळ्या रंगाची असून त्यांची लांबी 2 मी.मी. असते. अंडयातून निघालेली अळी पाय नसलेली, फिक्कट पिवळ्या रंगाची, 2-4 मी.मी. लांब असते. ही अळी प्रथम जवळच्या पानाच्या शिरेला छिद्र करते. अळीनंतर पानाचे देठातून झाडाचे मुख्य खोडात किंवा फांदीत प्रवेश करून आतील भाग पोखरून खाते. प्रादूर्भावग्रस्त खोड चिरुन पाहिल्यास पांढुरक्या रंगाची अळी किंवा कोषला लसर नागमोडी भागात दिसते.

खोडमाशीचा प्रादुर्भाव पिकाचे सुरुवातीचे अवस्थेत झाल्यास किडग्रस्त झाड वाळते व मोठ्या प्रमाणात नुकसान होते. मोठया रोपावर असा परिणाम दिसत नाही. परंतु अशा रोपावर खोडमाशीचे अळीचे प्रौढमाशीला बाहेर येण्यासाठी केलेले छिद्र आढळते. खोडमाशीची अळी तसेच कोष फांद्यात, खोडात असते.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा श्री संताजी अखिल तेली समाज संघटनेकडून सत्कार



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :

येथील खडगाव मार्गावरील श्री शितला माता महाकाली मंदिर सभागृहात श्री संताजी अखिल तेली समाज संघटना वाडी-डिफेन्स यांच्या वतीने रविवार, १५ जून रोजी दहावी आणि बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ पार पडला.

यशस्वी होण्यासाठी संघषार्ला सामोरे जाणे आणि स्वतःचे छंद ओळखून जोपासणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन गोविंदराव रोडे यांनी केले. विदभार्तून प्रथम आलेल्या अक्षरा शशांक गायधने (९८.८० टक्के) - सोमलवार हायस्कूल, रामदासपेठ, नागपूर - हिचा सामाजिक कार्यकर्ते गोविंदराव रोडे व कांचन माकडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच श्रेय उमेश गोमासे - ८५ टक्के संदीपनी स्कूल, प्रथमेश मनोज भुरे - ८० टक्के, केंद्रीय विद्यालय अंबाझरी,पियुष भगवान ढवळे - ८८.६० टक्के केंद्रीय विद्यालय अंबाझरी,सक्षम कृष्णा लिचडे - ८७.४० टक्के, प्रथमेश सुनील रागीट - ८१ टक्के, हर्ष अशोक शिदुरकर - ८३.६० टक्के, अनुष्का र. फटींग- ९०.४ टक्के रिलायन्स फाउंडेशन स्कूल, मौदा, संस्कृती महेंद्र मुळे - ९६.८ टक्के संदीपनी स्कूल (१२वी सीबीएससी ), नुपूर अनिल बजाईत - ८५ टक्के (१२वी सीबीएससी ) या वेळी सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक गोविंदराव रोडे , पुरुषोत्तम लिचडे, डॉ. देवेंद्र कैकाडे यांच्याहस्ते सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

यावेळी आयुध निर्माणीतील समाजसेविका रेखा आंबटकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल बजाईत यांनी केले.

संचालन त्रिवेणी हटवार यांनी तर आभार रोशन वैद्य यांनी मानले. आयोजनासाठी कान्होपात्रा रोडे, वैशाली दहागाणे, संजय मेहर, मुख्याध्यापक पुरुषोत्तम कामडी, मोतीराम शहारे, हरपालप्रसाद साहु, सूर्यभान चकोले, भूषण नरखेडकर, सुनील सरोदे, सुरेश बारई, अर्चना जांभूळकर आदींनी सहकार्य केले.

# ५१२४ वाहन चालकांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 5,124 वाहन चालकांवर कारवाई करून 4,07,500 रुपयांचा दंड वसूल केला.

त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये 5 व एनडीपीएस कायद्यान्वये एक अशा 6 प्रकरणात 6 आरोपींवर कारवाई करून 34,685 रुपयांचा माल जप्त केला. महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये 4 प्रकरणात 8 जुगाऱ्यांवर कारवाई करून 38,390 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

# बापरे! एटीएमच्या पैसे निकासी जागेवर लोखंडी पट्टी

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १६ :

ग्राहकाने एटीएम मशीन मधून पैसे काढण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्या मशीनच्या पैसे निकासी जागेवर ते पैसे बाहेर निघूच नयेत यासाठी वरून हुबेहूब मशीनचा भागच असल्यासारखी काळी लोखंडी पट्टी लावूनते पैसे हडपण्याचा प्रयत्न असल्याचा प्रकार आज सकाळी हिंगणा मार्गावरील वाडी टी पॉईंट येथील हिताची या कंपनीच्या एटीएम मध्ये समोर आला आहे.

आज सकाळी ८ वाजताच्या सुमारास संजय नगर येथील गुणरतन प्रसाद डुकरे ही व्यक्ती एटीएम मधून पैसे काढण्यासाठी आला. कार्ड स्वॅप करून आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण केली. तात्काळ खात्यातून पैसे डेबिट झाल्याचा मॅसेज त्याला आला. मशीनच्या बखाली पैसे निघायच्या आधी नोटा मोजण्याचा (गणक)फिरल्याचा आवाज आला. मात्र पैसे निकासी करण्याच्या जागेवर कुठल्याही प्रकारची नोटा बाहेर येण्यासाठी जागाच त्याला दिसली नाही.

या मशीनचा पार्ट वेगळा असेल काही वेळात पैसे बाहेर येईल म्हणून तो तिथेच थांबला पण पैसे बाहेर आलेच नाहीत. त्याने बाहेर निघून ही घटना लोकांना सांगितली.



या एटीएम च्या बाजूला पंचायत समितीचे माजी उपसभापती उमेश राजपूत यांचं दुकान आहे.तर माजी ग्राम पंचायत सदस्य संदीप साबळे हे सुद्धा तिथून जात होते. राजपूत त्या ग्राहकाला घेऊन एटीएम मध्ये गेले. तर त्यांना सुद्धा आश्चर्य वाटले. वरून वेगळीच प्लेट लागली हे लक्षात येताच एमआयडीसी पोलीसाना माहिती दिली. पेट्रोलिंग वर असलेले दोन कर्मचारी आल्यानंतर त्यांच्यासमोर ही पट्टी काढण्यात आली.ही पट्टी बघून सर्वांना आश्चरयाचा धक्काच बसला. सुदैवानं मशीन मध्ये टायमर असल्याने पैसे आतमध्ये परत जमा झाले होते.

त्या ग्राहकाने एमआयडीसी पोलिस ठाण्यात जाऊन याबाबत तक्रार नोंदवली आहे. काही महिन्यांपूर्वी असाच प्रकार आढळून आल्याचे उमेश राजपूत यांनी सांगितले. या एटीएम कंपनीने सीसीटीव्ही कॅमेरे तपासून कार्यवाही करावी व या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

या प्रकरणात अशा प्रकारे पट्टी लावून आरोपी एटीएमच्या बाजूला लपून बसत असावा व असे अडकलेले पैसे ग्राहक निघून गेले की मशीनमध्ये पैसे जाण्याच्या आत ती पट्टी काढून पैसे काढून नेणारे रॅकेट तर तयार झाले नाही ही भीती लोकांमध्ये पसरली आहे.

# ब्रह्मकुमारीज पाठशाला बिडगांव येथे बाल व्यक्तीमत्व शिबीर संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. १६ :

प्रजापिता ब्रह्मकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय व्दारा आयोजित नागेश्वर नगर बिडगांव बी पाठशाला येथे उन्हाळी बाल विकास व्यक्तीमत्व शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

पाच ते पंधरा वर्ष वयोगटातील मुला मुलींना बाल वयात चांगले संस्कार व्हावेत सध्या धावपळीच्या व्यस्त जीवनमानात पालक आणि मुलं यांच्यांत दुरावा निर्माण झाला असून मोबाईल फोनमुळे घराघरातील सर्व व्यक्ती सोबत संवाद साधला जात नाही. अनेक परिवारातील वातावरण तणावग्रस्त असतो. मोबाईल फोनचा वापर छोट्याशा मुलांन पासून तर वृध्दा पर्यंत खूप मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे मुलांचे शैक्षणिक क्षेत्रात दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. छोट्या मुलांना मोबाईल पासून कसा प्रकारे दुर ठेवता येईल आणि बाल वयात चांगल्या गोष्टीचे अनुकरण करून वाईट गोष्टी पासून कसा प्रकारे दुर ठेवता येईल. आजचे विद्यार्थी उदयाचे भारताचे भविष्य, आहेत.

तणावमुक्त जिवन आणि नैराश्य घालवण्यासाठी मेडीटेशन, योग, प्राणायाम हे सुखी, आनंदी निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली आहे. अशा विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले होते. यात प्रामुख्याने विविध शाळेतील पन्नास विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यावेळी ब्रम्हाकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालय छापरु नगर सेंटर च्या संचालिका रक्षा दीदी यांच्या प्रमुख उपस्थिती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित बि.के. एकता दीदी ,बी.के सत्यजित भाई ,बी.के नयन भाई लोहिया, बी.के योगेंद्रभाई चटप, राजकुमार भाई, बी.के. बी.के मंगला चटप, ब्रह्मकुमारी परिवारातील इतर सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आईस्क्रीम फॅक्टरीत २ बालकामगार

## संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

अल्पवयीन मुलांना कोणत्याही व्यवसायात किंवा प्रक्रियेत कामावर ठेवणे हा गुन्हा आहे. जर कंपनीमध्ये बालकामगार आढळले, तर त्या कंपनीवर कारवाई होऊ शकते, ज्यात दंड आणि तुरुंगवासाचा समावेश असू शकतो. त्यानंतरही अनेक कंपन्या किंवा संस्थांमध्ये बालकामगार दिसून येतात. अशीच एक घटना एमआयडीसी पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. परिसरातील एका आईस्क्रीम फॅक्टरीमध्ये बालकामगार काम करीत असल्याचे माहिती पोलिसांना मिळाली. या प्रकरणी पोलिसांनी संचालकाविरुद्ध बालन्याय अधिनियम कलम 75, 79, भारतीय न्याय संहिता 146 अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे. चाईल्ड हेल्पलाईन 1098 या टोल फ्री क्रमांकावर आईस्क्रीम फॅक्टरीमध्ये बालकामगार असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुसार अप्पर कामगार आयुक्त कार्यालयातील सहायक कामगार आयुक्त राजदीप धुर्वे, जिल्हा महिला बालविकास अधिकारी रणजित कुऱ्हे यांनी कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार अप्पर कामगार आयुक्त कार्यालयातील दुकान निरीक्षक अविनाश ढोके, परिमिती गजभिये यांनी फॅक्टरीमध्ये जाऊन बालकामगार शोध मोहीम राबविली.

# चिमुकल्या तीयाच्या गौळणने भट सभागृह झाले मंत्रमुग्ध



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

देवरंजन संस्थेतर्फे कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे नुकत्याच संपन्न झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात सहा वर्षे वयाच्या कु. तीया संजोग येरणे हिने "कशी मी जाऊ मथुरेच्या बाजारी" ही अप्रतिम गौळण सादर करून संपूर्ण सभागृहास मंत्रमुग्ध केले. श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांनीही तियाच्या नृत्याविष्काराचे तोंड भरून कौतुक केले.

प्रबोधन कॉन्व्हेंटची विद्यार्थिनी असलेली कु. तीया येरणे देवरंजन संस्थेत नृत्य दिग्दर्शक आणि कोरिओग्राफर चिन्मय देशकर यांच्याकडून नृत्याचे धडे घेत आहे. नृत्याशिवाय आई पूजा येरणेच्या मार्गदर्शनात तिया नाट्य अभिनयातही आघाडीवर आहे. तिने आजवर अनेक नाटकांमधून भूमिका साकारल्या आहेत.

# मा. गाथिः स्कूल ऑफ स्कॉलर्स, वानाडोंगरी येथे शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम




■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १६ :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या परिवर्तनकारी दृष्टिकोनाच्या अनुषंगाने, स्कूल ऑफ स्कॉलर्स, वानाडोंगरी यांनी १२ जून २०२५ रोजी शिक्षकांना धोरणाबद्दलची समज वाढवण्यासाठी आणि वर्गात त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तयार करण्यासाठी एक विशेष शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला.

कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलनाने झाली आणि त्यानंतर प्रमुख वक्ते श्रीमती अनुराधा सरदेशपांडे, माजी प्राचार्य रॉयल गोंडवाना पब्लिक स्कूल, नागपूर आणि श्रीमती अनमोल मुखर्जी, प्राचार्य, जैन इंटरनॅशनल स्कूल नागपूर यांचे स्वागत करण्यात आले. शिक्षकांनी NEP-संरेखित पद्धती लागू करण्याचे व्यावहारिक मार्ग शोधण्यासाठी केस स्टडीज, गट क्रियाकलाप आणि चर्चांमध्ये सक्रियपणे सहभाग घेतला. प्रशिक्षणात आनंदी आणि चौकशी-आधारित शिक्षणाचे सूत्रधार म्हणून शिक्षकांची भूमिका आणि सतत व्यावसायिक विकासाचे महत्त्व यावर देखील चर्चा करण्यात आली.

मुख्याध्यापिका डॉ. जया चक्रवर्ती यांनी आपल्या भाषणात, 2020 स्वीकारून शैक्षणिक उत्कृष्टता आणि नवोपक्रमासाठी शाळेच्या वचनबद्धतेवर भर दिला. सहभागींनी सुव्यवस्थित सत्रांबद्दल कौतुक व्यक्त केले आणि प्रशिक्षणाला ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी म्हटले. शिक्षकांचे विचार, संसाधन व्यक्तींसह प्रश्नोत्तरे या कार्यक्रमाचा समारोप झाला.

# पेंशन अदालत (प्रथम) चे नागपूर मंडळात यशस्वी आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

रेल्वे बोर्डाच्या निर्देशानुसार पेंशन अदालत 2025 (प्रथम) चे आयोजन मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळात दिनांक 16 जून 2025 रोजी DRM कार्यालयीन संकुलातील "गुंजन सभागृहात" यशस्वीरित्या पार पडले. या प्रसंगी अपर विभागीय रेल्वे व्यवस्थापक (तांत्रिक) रूपेश चंदेकर उपस्थित होते आणि त्यांनी सेवानिवृत्त रेल्वे कर्मचाऱ्यांना संबोधित केले. ही अदालत पारदर्शक आणि वेळेत पेंशन संबंधी तक्रारींच्या निवारणासाठी एक महत्वाचे व्यासपीठ ठरली. एकूण 39 अर्ज प्राप्त झाले होते, त्यापैकी 10 प्रकरणे ग्राह्य धरली गेली आणि त्यांचे निवारण करण्यात आले. या प्रकरणांमध्ये एकूण 1,84,338/- इतकी रक्कम वितरित करण्यात आली. उर्वरित 29 प्रकरणे प्रचलित नियमांनुसार ग्राह्य नसल्याचे आढळले. या कार्यक्रमात मान्यताप्राप्त संघटना, असोसिएशन्स आणि निवृत्त कर्मचारी समूहांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले. संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुरळीत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली, ज्यातून निवृत्त कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी मंडळाची कटिबद्धता अधोरेखित झाली.

# कुणबी सेवा संस्थेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

पालक दिनाचे औचित साधून कुणबी सेवा संस्थेतील कार्यालयात कुणबी समाजातील दहावी बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला आहे. कुणबी सेवा संस्थेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती कुणबी सेवा संस्थेचे अध्यक्ष रमेश फिस्के, उपाध्यक्ष सुरेश महल्ले, सचिव स्वप्निल राऊत, कोषाध्यक्ष सुधाकर सांभारतोडे, अशोक जवंजाळ रमेश पोद्दार, प्रशांत अर्डक, संजय भोंडे, प्रवीण ढोकणे, जगदुरु संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कुणबी समाजातील दहावी व बारावीत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

विद्यार्थ्यांनें सुद्धा आपले मनोगत या ठिकाणी व्यक्त केले. यानंतर सुरेशजी पाबळे यांनी कार्यक्रमाची रुपरेषा सांगून संस्थेच्या वतीने वर्षभरात काय काय कार्यक्रम राबवले, याची सविस्तर माहिती दिली. तसेच गुणवंत भिसे यांनी दहावी, बारावी नंतर काय करावे. तसेच अभ्यासावर कसा भर द्यावा, व पालकांनी काय करावे याचे सविस्तर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश पाबळे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार अशोक काकडे यांनी मानले. या कार्यक्रमास दहावी व बारावीतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली.

# २.३३ लाखांच्या मालावर डल्ला

**नागपूर** : कळमना ठाण्यांतर्गत अज्ञात आरोपींनी घरफोडी करून रोकड आणि दागिन्यांसह एकूण 2 लाख 33 हजार रुपये किंमतीच्या मालावर डल्ला मारला. या प्रकरणी पोलिसांनी अश्विन संजय जोशी (40) रा. बालाजीनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत 29 मे रोजी अश्विन घराला कुलूप लावून कुटुंबासह आईच्या विधिकायार्साठी कर्नाटकच्या कुलबर्गा येथे गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपींनी मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख 24 हजार आणि सोन्याचांदीचे दागिने चोरून नेले. शनिवारी जोशी कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली.

# इराई नदीतील गाळ काढण्यासाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने केले २ कोटी मंजूर

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :



वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यूईसीओएल) ने त्यांच्या प्रमुख सीएसआर उपक्रमाचा भाग म्हणून चंद्रपूर येथील इराई नदीतील गाळ काढण्यासाठी आणि स्वच्छतेसाठी २.०० कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने २५ एप्रिल ते १० जून २०२५ दरम्यान चंद्रपूर शहरापासून वर्धा नदी संगमापर्यंत इराई नदीतील गाळ काढण्यासाठी एक विशेष मोहीम सुरू केली होती. या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट पावसाळ्यात पूर रोखणे, स्वच्छता सुधारणे आणि पाणी साचणे आणि प्रदूषणामुळे उद्भवणारे गंभीर सार्वजनिक आरोग्य धोके कमी करणे हे आहे.

ईरई नदीजवळील वेस्टर्न कोल खाणी आहेत. म्हणूनच, चंद्रपूरच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी केलेल्या विनंतीला डब्ल्यूसीएलने तात्काळ सकारात्मक प्रतिसाद दिला आणि ०९. जून२०२५ रोजी नियोजन भवन, चंद्रपूर येथे आयोजित समारंभात या कामासाठी सामंजस्य करार (एमओयू) वर स्वाक्षरी केली.

या सामंजस्य करारावर डब्ल्यूसीएलच्या वतीने चंद्रपूर क्षेत्राचे प्रादेशिक महाव्यवस्थापक हर्षद दातार आणि डब्ल्यूसीएलच्या वतीने चंद्रपूर महानगरपालिकेचे आयुक्त विपिन पालीवाल यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

यावेळी विनय गौडा जी.सी. यांच्यासह अनेक मान्यवर लोकप्रतिनिधी आणि अधिकारी उपस्थित होते.

(जिल्हा दंडाधिकारी), पुलकित सिंग (मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषद), सुदर्शन मुम्मका (पोलीस अधीक्षक, चंद्रपूर),प्रा. (डॉ.) अशोक उईके (पालकमंत्री, चंद्रपूर), खासदार प्रतिभा सुरेश धानोरकर चंद्रपूर), डॉ. किरसान नामदेव खासदार, गडचिरोली-चिमूर), विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, आणि आमदार- कीर्तीकुमार मितेश भांगडीया, किशोर जोरगेवार, सुभाष धोटे, देवता संभाजी परिषद सदस्य, सुभाष कृष्णलेकर, गोविंदराव अडबळे आणि आमदार अभिजीत वंजारी होते . याआधीही, डब्लू सी एल ने पर्यावरण आणि सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टिकोनातून त्याच नदीतील गाळ काढण्यासाठी त्यांच्या पर्यावरण निधीतून एकूण ५.४१ कोटींचे योगदान दिले होते.

# "पाऊलवाटा करिअरच्या" या मार्गदर्शन पुस्तकाचे आ. मेघेंच्या हस्ते प्रकाशन



■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. १६ :

इयत्ता १० ,१२वी च्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या वाटा शोधण्यासाठी सर्वच प्रकारचे घ्यावयाचे शिक्षण व विविध कोर्सेस ची माहिती देणारे पाऊलवाटा करिअरच्या" या मार्गदर्शन पुस्तकाचे प्रकाशन आज आ. समीर मेघे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी या पुस्तकाचे प्रकाशक भाजप अनुसूचित जाती मोचार्चे प्रदेश उपाध्यक्ष अंबादास उके, प्रतीक उके, माजी उपसभापती सुरेश काळबांडे,भाजपचे जिल्हा मंत्री विनोद ठाकरे, डिगडोहचे माजी उपसरपंच कैलाश गिरी आदी मान्यवर उपस्थित होते.

या पुस्तकाचे लेखक विठ्ठल पवार असून या पुस्तकात १० वी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी सर्व शाखेची व त्याकरिता लागणाऱ्या पात्रतेची माहिती. १२ वी नंतर कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय प्रवेश पूर्व परीक्षा, त्यानंतर नोकरीच्या संधी, उपलब्ध कॉलेज याबाबत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

विशेष म्हणजे १० वी व १२वी उत्तीर्ण विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना हिंगणा मार्गावरील बन्सी नगर येथील अंबादास उके यांच्या कार्यालयातुन हे पुस्तक मोफत वाटप करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ४७ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :

महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. सोमवार (ता.१६) रोजी शोध पथकाने ४७ प्रकरणांची नोंद करून ३८,२००/- रुपयाचा दंड वसूल केला.

हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४०० /- दंड) या अंतर्गत १२ प्रकरणांची नोंद करून ४८००/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे(रू.१००/-दंड)या अंतर्गत ०१ प्रकरणांची नोंद करून १००/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ०८ प्रकरणांची नोंद करून ३२००/- रुपयांची वसुली करण्यात आली.



मॉल,उपहारगृहे,लॉजिंग, बोर्डिंगचे हॉटेल सिनेमाहॉल,मंगल कार्यालये, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्त्यावर कचरा टाकणे (रू.२,०००/-) या अंतर्गत ०३ प्रकरणांची नोंद करून ६,०००/- रूपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत ०८ प्रकरणांची नोंद करून ७५००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशॉप, गराज, व इतर दुरुस्तीचे व्यावसायीकांने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी कचरा टाकणे(रू.१०००/-दंड) या अंतर्गत ०१ प्रकरणाची नोंद करून १०००/- रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. चिकन सेंटर, मटन विक्रेता यांनी त्यांचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी अशा कचरा टाकणे(रू.१०००/-दंड) या अंतर्गत ०१ प्रकरणाची नोंद करून १०००/- रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास १३ प्रकरणांची नोंद करून २६००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास १२ प्रकरणांची नोंद करून १२,०००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत येणाऱ्या मे. शिवपुत्र अपार्टमेन्ट आणि मे. आर्क हेरिटेज अपार्टमेन्ट यांच्याकडून रस्त्यालगत बांधकामाचा कचरा टाकल्या प्रकरणी प्रत्येकी १०,००० असे एकूण रु.२०,०००/- रूपयांचा दंड वसूल करण्यात आला.

तसेच धरमपेठ झोन अंतर्गत येणाऱ्या मे. बालाजी होम मेकर्स बिल्डर्स डेव्हलपर्स यांच्याकडून रस्त्यालगत बांधकाम साहित्य टाकल्याप्रकरणी रू. १०,००० चा दंड वसूल करण्यात आला. हनुमान नगर झोन अंतर्गत येणाऱ्या मे.रिषभ बिल्डर्स यांच्याकडून रस्त्यालगत बांधकाम साहित्य टाकल्या प्रकरणी रू. १०,००० चा दंड वसूल करण्यात आला. धंतोली झोन अंतर्गत पुरूषोत्तम ढवळे यांच्याकडून प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याप्रकरणी रू.५,००० चा दंड वसूल करण्यात आला.

# पर्यावरणाशी नाते जोडा, निसर्गाचा समतोल राखा : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १६ :

"संपूर्ण जगाला प्लास्टिकमुक्त करुया" या २०२५च्या जागतिक पर्यावरण दिनाच्या घोषवाक्याच्या अनुषंगाने संपूर्ण जगात साजरा होणाऱ्या जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पर्यावरण व निसर्ग संस्था, घोगली यांच्या वतीने पर्यावरण सप्ताहाचे आयोजन मंत्रा सेलिब्रेशन हॉल, बेसा येथे झालेल्या या भव्य कार्यक्रमाला राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.




कार्यक्रमात बेसा-पिपळा नगरपंचायतचे मुख्याधिकारी भारत नंदनवार, पर्यावरणतज्ज्ञ मकरंद पांढरीपांडे, ग्रीन व्हिजिल फाउंडेशनचे कौस्तुभ चटर्जी, ग्रामायण प्रतिष्ठानचे संजय सराफ, आणि कम्युनिटी कॉलेज ऑफ टेक्नोलॉजी ॲन्ड रिसर्चच्या संचालक डॉ. ए.एन. राधा व्यासपीठावर उपस्थित होते. प्रास्ताविक संस्थेचे सचिव राजेंद्र राजुरकर यांनी केले. संचालन अध्यक्ष मधुकर सुरवाडे यांनी तर आभार संस्थेचे कोषाध्यक्ष नरेश भोयर यांनी मानले. चंद्रशेखर बावनकुळे यांनी पर्यावरण व निसर्ग संस्थेच्या पुढाकाराचे कौतुक करत बेसा नगरपंचायतीत कचऱ्यापासून खत निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी उपाययोजना करण्याची घोषणा

## बेसा येथे पर्यावरण सप्ताह

केली. त्यांनी नागरिकांना "आपल्या आईच्या नावाने एक झाड लावा" असे आवाहन करत, रुफटॉप रेन हार्वेस्टिंगद्वारे पाण्याचे योग्य व्यवस्थापन करावे असेही सुचवले.

संजय सराफ यांनी कचरा उचलणाऱ्यांचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी असल्याचे नमूद केले. कौस्तुभ चटर्जी यांनी सादरीकरणाद्वारे ग्लोबल वॉर्मिंगचे भीषण परिणाम स्पष्ट केले आणि "पृथ्वी वाचवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीचा सहभाग आवश्यक" असे सांगितले. डॉ. राधा यांनी कॉलेज परिसरात २ हजार झाडे लावून त्यांचे संगोपन केले असल्याची माहिती दिली. राजेश सोनटक्के यांनी कचऱ्यापासून खत निर्मिती उपक्रम, आणि 'निसर्ग शाळा' मॉडेल संकल्पनेची माहिती दिली.

मुख्याधिकारी भारत नंदनवार यांनी सांगितले की, गेल्या दोन वर्षांत ७ हजार झाडे लावण्यात आली, तसेच ओला-सुका कचऱ्याचे व्यवस्थापन व प्लास्टिकपासून बेंच निर्मितीचे कार्य सुरू आहे. पंचसूत्री संकल्प - कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात मधुकर सुरवाडे यांनी पर्यावरण रक्षणासाठी खालील पंचसूत्री संकल्प जाहीर केला. बेसा-पिपळा परिसर स्वच्छ, सुंदर व हिरवे बनवणे . "एक घर, एक झाड" मोहिम रुफटॉप हार्वेस्टिंगद्वारे पाणी बचत स्वयंस्फूर्तीने स्वच्छता अभियान पर्यावरण जनजागृतीसाठी कार्यशाळा आयोजनासाठी भैय्याजी रेवतकर, मनीषा राजुरकर, महेंद्र मरशिंगे, नितीन निखाडे, विनोद कनोजिया आणि विनोद कुमार वेखंडे यांचे विशेष योगदान राहिले.

# बोंद्री शिवारात वाघाचा हल्ल्यात गाय गंभीर जखमी



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १६ :

रामटेक वनपरिक्षेत्रांतर्गत बोंद्री शिवारात दि.१५ जुन ला रविवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास वाघाने भरदिवसा गाईवर हल्ला चढवून तिला गंभीर जखमी केले. सत्रापूर पाठोपाठ आता बोंद्री शिवारात वाघाचा धुमाकूळ सुरू असल्याने स्थानिक शेतकरी भयभीत झाले आहेत.

पशुपालक फुलचंद चौधरी हे नेहमीप्रमाणे जनावरे चराईसाठी बोंद्री परिसरात घेऊन गेले होते. सत्रापूर ते बोंद्री परिसरात अचानक एका वाघाने त्यांच्या गाईवर हल्ला केला. मात्र पशुपालक फुलचंद चौधरी यांनी वेळीच आरडाओरड केल्याने वाघ गाईला सोडून पसार झाला. या हल्ल्यात गाय गंभीर जखमी झाली आहे. घटनेची माहिती तत्काळ रामटेक वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे यांना देण्यात आली. त्यांनी तातडीने मनसरचे क्षेत्र साहाय्यक मुनेश्वर गोंडीमेश्राम, वनरक्षक दीपाली नान्हे व वनमजूर एकनाथ भोयर यांना घटनास्थळी पंचनामा करण्यासाठी पाठवले. जखमी गाईवर उपचार सुरू आहे. दुसरीकडे १५ दिवसांपासून सत्रापूर परिसरात वाघाचा धुमाकूळ सुरू आहे. तेथे गाय, बकरी आणि वासराला भक्ष्य केल्याच्या घटना घडल्या आहेत. वनविभागाने या वाघाचा तत्काळ बंदोबस्त करावा, अशी गावकऱ्यांची मागणी आहे.

# चंद्रशेखर भोंडवे महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

युवा महाराष्ट्र फाउंडेशन आणि आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र रत्न पुरस्कार-2025 पुणे येथे घेण्यात आला होता. त्यामध्ये विविध क्षेत्रातील कार्य करणाऱ्या कर्तुत्वान व्यक्तींचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र रत्न पुरस्काराला सन्मानित करण्यासाठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी तसेच डॉ. अविनाश सरकुंडे, गणेश विटकर, आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन पुणे आणि इतर प्रमुख नेते मंडळींना पुरस्कार वितरण सोहळ्यात सन्मानित करण्यात आले. नागपूर येथील चंद्रशेखर नामदेवराव भोंडवे अध्यक्ष संजीवन गोपाळकृष्ण संस्था तथा सामाजिक कार्यकर्ता म्हणून त्यांची समाजातील कर्तव्य लक्षात घेता शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य, पर्यावरण या कार्याचे दक्षता घेण्यात आल्यामुळे त्यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्राप्त झाला.

संजीवन गोपाल कृष्ण संस्थेचे कार्य लक्षात घेता त्यांनी विशेष मागास प्रवगार्तील मुला - मुलीकरिंता शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. तसेच त्यांच्या निवासाची सुद्धा सोय उपलब्ध केली. तेव्हा समाजात बऱ्याच सामाजिक कार्य लक्षात घेता महाराष्ट्र रत्न पुरस्कारने सन्मानित करण्यात आले आहे. भोंडवेनी चांगले कार्य केल्याने पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल संस्थेचे पदाधिकारी आणि मा. सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, नागपूर तसेच प्राथमिक, माध्यमिक आश्रम शाळा मसाळा येथील कर्मचाऱ्यांकडून तसेच उच्च स्तरांवरून अभिनंदन करण्यात आले.

# लुटपाट करण्यापूर्वीच पोलिसांनी पकडले चोरट्यांना

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

निर्जन स्थळावर लुटपाट करण्याच्या तयारीत असलेल्या 3 तरुणांना गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने चोरीच्या वाहनांसह पकडले. झडतीमध्ये त्यांच्याजवळ तीक्ष्ण शस्त्रेही मिळाली. आरोपींमध्ये एका 17 वर्षीय अल्पवयीनचाही समावेश आहे. अल्पवयीनला चौकशीसाठी ताब्यात घेऊन इतर दोघांना अटक करण्यात आली. आदिल खान उर्फ अद्दू इमरान खान (19) रा. आझाद कॉलनी, मोठा ताजबाग आणि साहिल अली उर्फ गुज्जर मुख्तार अली (19) रा. हसनबाग अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

शनिवारी सायंकाळी गुन्हे शाखेचे पथक कपिलनगर पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान एमआरए म्हाडा कॉलनी आणि उप्पलवाडीदरम्यान कच्च्या रस्त्यावर काही असामाजिकतत्व दरोड्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी परिसराची घेराबंदी करून तेथे धाड टाकली. वरील आरोपी 2 दुचाकी वाहनांसह तेथे संशयास्पदरित्या आढळले. त्यांना ताब्यात घेऊन झडती घेतली असता वाहनांच्या डिक्कीमध्ये दोन चाकू मिळाले.

# लाईफ सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी २१ जून रोजी करिअर मार्गदर्शन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

येत्या शनिवारी, २१ जून २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता, धरमपेठ नागपूर येथील आयएमए हॉल येथे 'कॉलेज २ कॉर्पोरेट' या नावाने एक करिअर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. लाईफ सायन्स/जीवन विज्ञान आणि आरोग्यसेवा पार्श्वभूमीच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थी आणि पदवीधरांसाठी हे मार्गदर्शन सत्र उपयुक्त असणार आहे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना क्लिनिकल रिसर्च मध्ये करिअरच्या संधीबद्दल माहिती देणे हा आहे.

हा कार्यक्रम बी.फार्मा, एम.फार्मा, बी.एससी., एम.एससी., एमबीबीएस, बीएएमएस, बीएचएमएस, नर्सिंग, बीडीएस आणि इतर जीवन विज्ञान संबंधी शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी खुला आहे. कार्यक्रमाच्या ठळक वैशिष्ट्यांमध्ये सहभाग प्रमाणपत्र, "क्लिनिकल रिसर्चमधील टॉप १० मुलाखत प्रश्न" शीर्षक असलेले एक मोफत ई-पुस्तक आणि अर्ली बर्ड स्कॉलरशिप कोड यांचा समावेश आहे. या कार्यक्रमात एम्स नागपूरच्या औषधनिर्माणशास्त्राचे प्राध्यापक आणि परीक्षांचे डीन डॉ. गणेश दाखले यांच्यासारख्या प्रख्यात वक्त्यांचा समावेश असलेली पॉवर पॅनेल चर्चा होणार आहे. यात रेणुका निओगी, डीजीएम, सन फार्मा आणि अध्यक्ष, वेस्टर्न चॅप्टर, आयएससीआर; डॉ. अनुपमा हरिहरन, असोसिएट डायरेक्टर आणि एचबीए डायरेक्टर, आयक्यूव्हीआयए; रवी गवारे, २० वर्षांहून अधिक अनुभव असलेले जागतिक क्लिनिकल रिसर्च लीडर; डॉ. संतोष टेंभेरे, आयकॉन येथे प्रोजेक्ट लीड आणि जोखीम-आधारित देखरेखीचे तज्ज्ञ; भूषण महाजन, प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी झ्र आरटीएमएनयू सहभागी होणार आहे.

कॅनव्हास क्लिनिकल रिसर्च सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड द्वारे हा कार्यक्रम आयोजित केला जात आहे. सीईओ विजया भक्ते यांनी पात्र विद्यार्थ्यांना या संधीचा पुरेपूर लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. अधिक माहिती आणि नोंदणीसाठी, इच्छुक सहभागी ७६२०९ ६२३४८ वर संपर्क साधू शकतात.

# प्रेम त्रिकोणातून तरुणाची हत्या

## अल्पवयीनसह चौघांना पोलिसांनी घेतले ताब्यात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

प्रेम त्रिकोणातून अल्पवयीनसह चार आरोपींनी एका तरुणाला योजनाबद्धरित्या भेटायला बोलावून त्याची हत्या केली आणि पसार झाले. ही थरारक घटना शनिवारी रात्री मानकापूर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. मात्र हे हत्याकांड रविवारी दुपारी उघडकीस आले, जेव्हा खुनाच्या घटनेने घाबरलेल्या एका आरोपीने पोलिसात जाऊन घटनेची माहिती दिली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन तीन आरोपींना अटक केली.

तर 17 वर्षीय अल्पवयीनला चौकशीसाठी ताब्यात घेतले. अमन राजेंद्र ध्रुववंशी (20) रा. महाराणा अपार्टमेंट, स्वामीनगर, गोरेवाडा असे मृताचे नाव आहे. लकी सुनील मेंढेवार (18) रा. स्विपर कॉलनी, गंगाबाई घाट, अभिषेक राजेश कटारिया (20) रा. गोरेवाडा आणि सुलभ ठाकूर (19) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

अमन शिमला येथील एका महाविद्यालयात हॉटेल मॅनेजमेंटचा विद्यार्थी होता. लकी आणि इतर आरोपी खासगी संस्थांमध्ये हाऊस किपिंगचे काम करतात. रोज नावाच्या तरुणीसोबत अमन आणि लकीचे प्रेमसंबंध होते. मात्र दोघांनाही याबाबत माहिती नव्हते. जवळपास 6-7 महिन्यांपूर्वी अमन आणि रोज फिरायला रामा डॅम येथे गेले होते. तेथून परत येताना दोघांचाही अपघात झाला. तेव्हा लकीला अमन आणि रोजच्या प्रेमसंबंधाबाबत माहिती मिळाली. यावरून अमन आणि लकीमध्ये वाद ही झाला होता.

त्यानंतर अमनने रोजपासून दुरावा केला. मात्र लकीला अमन अजूनही रोजच्या संपर्कात असल्याचा संशय होता. याबाबत माहिती काढण्यासाठी लकीने रोजच्या नावाने बनावट इंस्टाग्राम आयडी तयार केली. या माध्यमातून तो अमनशी चॅटिंग करू लागला. शनिवारी रात्री लकीने रोजच्या बनावट आयडीतून अमनला संदेश पाठवला. त्याला भेटण्यासाठी मिलिट्री मैदानात बोलावले. लकी अभिषेकसोबत तेथे पोहोचला. अमन तेथे पोहोचताच दोघांनीही त्याच्याशी वाद घातला. अमनने त्यांना समजवण्याचा प्रयत्न केला. रोजसोबत त्याचा काहीही संबंध नसल्याचे सांगितले. लकीने त्याला इंस्टाग्रामवरील चॅटिंग दाखवली. त्यानंतर दोन्ही आरोपी अमनला त्याच्याच एमएच-31/एफजे-1160 क्रमांकाच्या दुचाकीवर बसवून गोरेवाडा जंगलातील टेकडीवर घेऊन गेले. दरम्यान सुलभ आणि अल्पवयीनही तेथे पोहोचले. चौघांनीही मिळून अमनला मारहाण सुरू केली. त्याच दरम्यान लकीने चाकू काढून अमनच्या छातीत भोसकला. अमन रक्तबंबाळ होऊन जागीच कोसळला. चारही आरोपी तेथून फरार झाले.

### अशी आली घटना उघडकीस

रात्रभर चारही आरोपी आपल्या घरीच होते. मात्र अभिषेकला घटना उघडकीस आली तर काय होईल, अशी भीती वाटू लागली. घाबरलेल्या अवस्थेत तो स्वतः मानकापूर ठाण्यात पोहोचला. अमन आणि लकीमध्ये झालेल्या वादाची माहिती दिली. गोरेवाडा जंगलात नेऊन त्याचा चाकूने खून केल्याची माहिती दिली. मानकापूरचे ठाणेदार हरीश कळसेकर पथकासह घटनास्थळी पोहोचले. अमनच्या मृतदेहाचा पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी मेयो रुग्णालयात पाठवले. अभिषेकच्या कबुली जबाबावरून अन्य तिन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले. कळसेकर यांनी सांगितले की, प्राथमिक तपासात प्रेम संबंधातून ही घटना घडल्याचे समोर आले आहे. अटकेतील तिन्ही आरोपींना सोमवारी न्यायालयात हजर केले जाईल.

# नीट युजी परिक्षेत आकाशच्या शाश्वत कुतरमारेने एआय आर रैक ८९७ पटकावली

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

देशातील आघाडीची टेस्ट प्रिपरेशन संस्था आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड आहे. त्यांच्या नागपूर शाखेतील ५६ विद्यार्थ्यांनी नीट युजी २०२५ या अत्यंत स्पर्धात्मक वैद्यकीय प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ही कामगिरी विद्यार्थ्यांच्या समर्पण, शैक्षणिक शिस्त आणि दर्जेदार मार्गदर्शन व प्रशिक्षणाचे प्रमाण आहे. हा निकाल नॅशनल टेस्टिंग एजन्सी ( एनटी ए) ने अधिकृतपणे जाहीर केले.

आकाश एज्यु. नागपूर शाखेच्या विद्यार्थ्यांनी निट युजी २०२५मध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे. शाश्वत कुतरमारेने ऑल इंडिया रैंक ( एआय आर) ८९७ मिळवली, त्याचबरोबर समीद मोहम्मद साजिद ( ए आय आर १५१४), अनुभव सुधीर सिंह (एआय आर) २६०९ ), मृणाल जाधव ( एआय आर २९३६), आयुष गजबिये (एआय आर ३२७४), अथर्व देव सिंह ( ए आय आर ४१७५ ), अनीश डागर (एआय आर ६२१३र 4786 ), श्रेयस जाधव ( एआय ६२१३), ध्रुव गवांडे ( एआय आर ६४४३), नैंसी प्रसाद ( एआय आर ६५०३) आणि जिया अमरानी ( एआय आर ७०१०) यांनीही उल्लेखनीय यश मिळवले, जे नागपूर केंद्राच्या शैक्षणिक गुणवत्तेचे आणि शिक्षणातल्या निष्ठेचे दर्शन घडवते. नीट परीक्षा दरवर्षी नॅशनल टेस्टिंग एजन्सी द्वारे घेतली जाते. ही परीक्षा भारतातील शासकीय आणि खासगी संस्थांमध्ये फमबी बीएस, बीडीएस, आयुष, बीए एम एस, बी यु एम एस अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे.



आकाशचे चीफ अकॅडेमिक आणि बिझनेस हेड डॉ.एच. आर.राव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले, नीट युजी २०२५ मध्ये आमच्या विद्यार्थ्यांनी केलेली उज्वल कामगिरी पाहून आम्हाला अत्यंत अत्यंत अभिमान वाटतो. एवढ्या मोठ्या स्पर्धेत देशभरातून लाखो विद्यार्थी सहभागी होतात, आणि त्या स्पर्धेतून हे यश मिळवणे नक्कीच कौतुकास्पद आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचा पाठिंबा आणि शिक्षकांचे समर्पण आहे. आम्ही त्यांना त्यांच्या वैद्यकीय करिअरमध्ये उत्तम यशाच्या शुभेच्छा दिल्या.

# नाहरकतीत अडकल्या तासिका प्राध्यापकांच्या नेमणुका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

१६ जून पासून राज्यातील सर्व महाविद्यालये सुरू होत आहे. नागपूर सहसंचालक विभाग वगळता उर्वरित महाराष्ट्रातील तासिका प्राध्यापकांच्या नेमणुकीची प्रक्रिया मार्चपासूनच सुरू झाली.नागपूर उच्च शिक्षण विभागात हा वेग अत्यंत मंद असून शैक्षणिक सत्र सुरू झाले तरिही तासिका प्राध्यापकांच्या नेमणुकीसाठी लागणारी महाविद्यालयाला दिली जाणारी नाहरकत प्रमाणपत्र अद्यापही नागपूर सहसंचालक कार्यालयातून अदा न झाल्याने तासिका प्राध्यापकांच्या नेमणुकीचे उच्च शिक्षण विभागाचे संपूर्ण कोष्टकच कोसळले आहे.असा आरोप महाराष्ट्र अंशकालीन प्राध्यापक संघटना व प्राध्यापक पदभरती महासंघाचे अध्यक्ष डॉ.प्रमोद लेंडे खैरगावकर यांनी केला आहे.

सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने १७ ऑक्टोबर २०२२ ला एका परिपत्रकात संघटनेला तासिका प्राध्यापकांच्या नेमणुकीचा कार्यक्रम दिला होता. १५ फेब्रुवारी कार्यभार तपासणी,१ मार्च नाहरकत प्रमाणपत्र मागणी, १५ मार्च नाहरकत निर्गमित करणे, १ एप्रिल जाहिरात प्रसिद्धी देणे, १५ एप्रिलपर्यंत अर्ज छाननी, मुलाखती व उमेद्वारांची निवड, ३० एप्रिल नेमणूक आदेश निर्गमित करणे, विद्यापीठ मान्यता,१५ जून तासिका तत्त्वावरील अध्यापकांची सेवा उपलब्ध करून देणे.सरकारने दिलेल्या तासिका प्राध्यापकांच्या नेमणुकींच्या कोष्टकालाच उच्च शिक्षणातील अधिकाऱ्यांनी हरताळ फासला आहे.

राज्यात १२ वर्षांपासून संपूर्ण प्राध्यापक भरतीचा कार्यक्रम सरकारने दिला नाही. अंशतः ४०% पदभरती २०१७ च्या विद्यार्थी संख्येनुसार झालेली आहे. १६ हजारांहून अधिक प्राध्यापकांची पदे राज्यातील विविध महाविद्यालयात रिक्त आहेत. विनाअनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापक पदभरतीचाही तिढा सुटता सुटत नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाने राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांमधील पदभरतीचे वारंवार निर्देश दिले.अनेक महाविद्यालयांना नॅक मूल्यांकनाला सामोरा जाताना पुरेसा प्राध्यापक वर्ग सेवेत नसल्याने बराचसा त्रास सोसावा लागला.

अशा परिस्थितीत महाविद्यालयांच्या दिमतीस असलेल्या तासिका प्राध्यापकांवर नॅकचा भार सोसलेला आहे. ती पदभरती ६ वर्षेपर्यंत रेंगाळत ठेवते.उच्च शिक्षणातील वाढती बेरोजगारी तासिकेवर उपजिविका करणाऱ्यांना प्राध्यापकांना भूकेचा प्रश्न सोडवते पण प्राध्यापक पदभरतीची आस स्वस्थ बसू देत नाही.सरकारच्या घोषणांच्या बाजारात राजकीय लिल्लावात जणू दिवास्वप्न पाहिल्यासारखी स्थिती नेट,सेट, पीएच.डी. पात्रताधारकांची आहे. तासिकांवर अध्यापन करणाऱ्यांना ९ महिन्यांची मयार्दा सरकारने घालून दिलेली असताना तीच मुजोर शासनातील अधिकारी व्यवस्था ७ महिन्यांचेही मानधन मिळू देत नाही.मग अशा शासन निर्णयाचा आणि संघटनांसोबत केलेल्या समन्वयाच्या हेतूचीच अवहेलना सरकारी यंत्रनेने केली. असा आरोप डॉ.प्रमोद लेंडे खैरगावकर यांनी केला आहे.

# ट्रकच्या धडकेत विद्यार्थिनीचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

महाविद्यालयातून मित्रासोबत दुचाकीने घरी जात असलेल्या विद्यार्थिनीला भरधाव ट्रकने धडक दिली. या अपघातात विद्यार्थिनीचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला, तर विद्यार्थी किरकोळ जखमी आहे. ही घटना सेंट्रल एमआयडीसी मार्गावर घडली. हर्षिता परमानंद बांबल (18) रा. कळमेश्वर असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. जखमी विद्यार्थी चैतन्य वसंत राजगुरे (20)च्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. हर्षिता आणि चैतन्य कळमेश्वर येथीलच रहिवासी असल्याने त्यांच्यात मैत्री होती. हर्षिता वानाडोंगरीच्या फार्मसी महाविद्यालयात शिकत होती. शनिवारी दुपारी 2 वाजताच्या सुमारास चैतन्य आणि हर्षिता महाविद्यालयातून घरी जात होते. सेंट्रल एमआयडीसी मार्गावर ट्रक चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवत चैतन्यच्या वाहनाला मागून धडक दिली. धडकेमुळे हर्षिता ट्रकच्या बाजूला, तर चैतन्य दुसऱ्या बाजूला पडला. पळून जाण्याच्या प्रयत्नात ट्रक चालकाने हर्षिताला चिरडले आणि पसार झाला. हर्षिताला आधी खासगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी प्रकृती नाजूक असल्याने तिला मेडिकल रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला.

# आमदार डॉ. आशिष देशमुख यांचा शेतकरी शिष्टमंडळासह नाशिक, जालना येथे अभ्यास दौरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

सावनेर-कळमेश्वर आणि काटोल-नरखेड विधानसभा क्षेत्रातील 30 प्रगतीशील शेतकऱ्यांचे अभ्यासपूर्ण शिष्टमंडळ घेऊन आमदार डॉ. आशिषराव देशमुख नाशिक येथे १३ जून२०२५ रोजी रवाना झाले. सकाळी ७ वा. निघून दुपारी २ वा. नाशिक मोवाडी तालुका एफ. फार्मर कंपनी, सह्याद्री फार्म येथे त्यांनी भेट दिली. सह्याद्रीच्या सर्व संचालकांनी आमदार डॉ. आशिषराव देशमुख व शेतकरी शिष्टमंडळाचे स्वागत केले. ह्यांनतर सह्याद्री फार्म एका एकर पासून तर १२० एकर पर्यंत विस्तारित कसा झाला, याचे प्रत्यक्षित दिले गेले.



हया संस्थेचे मुख्य संचालक विलास यांची गरिबीच्या परिस्थितीतून उंच शिखरावर पोहचलेल्या कंपनीची स्थापना १९९५ झाली असून आज ती भारतातील पहिल्या क्रमांकाची निर्यात कंपनी सिद्ध झाली आहे.

आमदार डॉ.आशिषराव देशमुख यांच्या हया दौऱ्याचा उद्देश नागपूर जिल्हाच्या शेतकऱ्यांना या यशस्वी मॉडेलची ओळख करुन देणे आणि त्यांच्यात एक सकारात्मक बदल घडविणे होय. सह्याद्री फार्मने द्राक्षासह टोमॅटो, डाळिंब, आंबा, संत्रा, केळी, काजू व अनेक पिकांचे उत्पादन करून शेतकऱ्यांच्या उत्पनात मोठी वाढ साधली आहे. हा अनुभव नागपूरच्या शेतकऱ्यांसाठी अतिशय प्रेरणादायी ठरला आहे. अशा प्रकारे एकत्र येऊन आपणसुद्धा कृषी व्यवसायात प्रवेश करू शकतो. भारत देश कृषीप्रधान देश असूनसुद्धा शेतकऱ्यांना भरपूर समस्यांना समोरे जावे लागते. यासाठी पुढील काळात नागपूर जिल्ह्यासाठी असंच मॉडेल उभे करण्यासाठी सतत कार्यरत राहून तसेच शेतकऱ्यांना मानसन्मान मिळवून त्यांच्या कष्टाला न्याय देण्याचे ध्येय आमदार डॉ आशिषराव देशमुख यांचे राहणार आहे.

दि. १४ जून रोजी अभ्यास दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील दौलताबादमधील माळीवाडा आणि जालना जिल्ह्यातील अंतरवाला या भागांना भेट दिली. या दौऱ्यात शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष सोबतीने विविध शेती प्रयोगांचा आणि यशस्वी प्रकल्पांचा आढावा घेतला. या भेटीत माळीवाडा येथे अंजीर बागांची पाहणी करताना त्यांनी आधुनिक बागायती तंत्रज्ञान, सिंचन व्यवस्था आणि फळबाग व्यवस्थापनाचे बारकावे समजून घेतले. अंजीर उत्पादनात स्थानिक शेतकरी घेत असलेला पुढाकार आणि त्यातून निर्माण झालेल्या अर्थव्यवस्थेचीही त्यांनी माहिती घेतली. शेतकरी व व्यापाऱ्यांच्या निर्यात विषयक अडचणींसाठी विधानसभेत आवाज उठवणार, असे आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी या दौऱ्यात म्हटले. या दौऱ्यामध्ये आमदार डॉ.आशिषराव देशमुख यांच्या समवेत शेतकरी शिष्टमंडळामध्ये अशोक धोटे, बाबा बुऱ्हाण, संजय जीवतोडे, मनोज जवंजाळ, महादेव नखाते, दिनकर राऊत, प्रवीण लोहे, संदीप उपाध्याय, धनंजय मुसळे, सरपंच आशुतोष तभाने, मंगेश कोठाडे, बाळू देशमुख, कुलदीप हिवरकर, शरद जुडपे इत्यादी शेतकरी होते.

# रिलायंस स्मार्ट बाजारातून लाखोंचा माल चोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

रामदासपेठच्या लॅन्डमार्क इमारतीतील रिलायंस स्मार्ट बाजारातून 5.68 लाखांचा माल चोरी झाला. या प्रकरणात पोलिसांनी परिसरातच चौकीदारीचे काम करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पुंडलिक ठाकरे रा. योगेश्वरनगर, दिघोरी असे आरोपीचे नाव आहे.

फिर्यादी मंगेश विनायक तेलकुंटे हे स्मार्ट बाजारात व्यवस्थापक आहेत. त्यांनी वेअरहाऊस आणि स्टोअरचे सामान तपासले असता उपलब्ध मालामध्ये काही वस्तू कमी होत्या. त्यामुळे त्यांनी स्टोअरमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली.

त्यात 15 फेब्रुवारी ते 30 एप्रिल 2025 दरम्यान पुंडलिक वेळोवेळी स्टोअरमध्ये आला. त्याने कपड्यांतील 6,431 उत्पादन चोरी केले. ज्यांची किंमत 5 लाख 68 हजार रुपये होती. पुंडलिक इमारतीच्या सहाव्या माळ्यावरील एसएएस डेव्हलपर्समध्ये चौकीदार आहे. त्यामुळे स्टोअरच्या कर्मचाऱ्यांनी त्याला ओळखले आणि पोलिसात तक्रार करण्यात आली.